रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १६ ◆ अंक २६९
www.ramprahar.com

बुधवार, १७ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## रामनवमीनिमित्त अयोध्या सजली; भाविकांसाठी विविध सुविधा

**अयोध्या** : येथील भव्य दिव्य राम मंदिर २२ जानेवारीला खुले झाल्यापासून दररोज साधारणपणे



एक लाख भाविक रामलल्लाच्या दर्शनासाठी येतात, पण यंदाची रामनवमी रेकॉर्डब्रेक गर्दीची ठरण्याची शक्यता आहे. रामनवमीला दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीच्या दृष्टीने राम मंदिर ट्रस्टने काही विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सोबतच दर्शनासाठी येताना सूचनांचे पालन करण्याचे आवाहनसुद्धा करण्यात आले आहे. रामनवमीच्या दिवशी ब्रह्म मुहूर्तावरच दर्शन रांगेत उभे राहण्याची व्यवस्था केली जाणार आहे. रामलल्लाची मंगल आरती सुरू होण्याच्या एक तास आधी भाविकांना दर्शनासाठी रांग लावता येणार आहे. मंदिर परिसरात भक्तांचे पाय उन्हाने पोळू नयेत यासाठी खास मॅट अंथरल्या गेल्या आहेत. भाविकांनी उन्हापासून स्वतःचे संरक्षण करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# विरोधकांकडे सांगण्यासारखे काहीच नाही

## खासदार श्रीरंग बारणे यांचा हल्लाबोल



**कर्जत : प्रतिनिधी**

संपूर्ण मावळ लोकसभा मतदारसंघात विरोधी पक्ष कोठेही दिसत नाही. विरोधी पक्षाच्या उमेदवाराकडे सांगण्यासारखे काहीच नाही. ते केवळ विरोधासाठी विरोध करीत आहेत. विरोधी पक्षाच्या उमेदवाराने मतदारसंघात केलेले एकतरी काम दाखवावे, असे आव्हान शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, मनसे, आरपीआय, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले. ते कर्जत येथे महायुतीच्या समन्वय समिती बैठकीत बोलत होते.

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघाची महायुतीची समन्वय समिती बैठक सोमवारी (दि.१५) कर्जतमधील साईकृपा शेळके सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या वेळी खासदार बारणे यांनी, महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रचार करताना स्वतःची काळजी घ्यावी. तापमान ४१–४२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले आहे. अशा परिस्थितीत दुपारी बाहेर पडणे टाळून सकाळी व संध्याकाळी प्रचारावर भर द्यावा, अशी सूचना पदाधिकाऱ्यांना केली.

या बैठकीस भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, भाजप क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, राष्ट्रवादीचे नेते व जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, सहचिटणीस भरत भगत, जिल्हाध्यक्ष हनुमान पिंगळे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, भाजपचे विधानसभा प्रमुख किरण ठाकरे, तालुकाध्यक्ष राजेश भगत, नरेश पाटील, प्रवीण मोरे, विजय पाटील, भाई गायकर, शिवराम बदे, पंकज पाटील, संभाजी जगताप, संदेश पाटील, राहुल डाळिंबकर, प्रमोद महाडिक, हिरामण गायकवाड, सचिन कर्णूक, विजय सावंत, महेंद्र निगुडकर, जे.पी. पाटील, भगवान भोईर, भगवान चंचे, संतोष बैलमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, जनतेने मागील निवडणुकीत भाजप–शिवसेना युतीला मते दिली होती. जनतेच्या कौलाचा आदर ठेवत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आम्ही आमदार–खासदारांनी भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. आता महायुतीचा धर्म आपण सर्वांनी मिळून पाळायचा आहे. पंतप्रधान मोदींचे हात बळकट करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांना निवडून देऊया. मी कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघातून खासदार बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य मिळवून देणार आहे. (पान २ वर..)

> **गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघात विकासकामे केली आहेत. विरोधकांकडे प्रचारासाठी कोणताही मुद्दा नसल्यामुळे त्यांनी धादांत खोटा प्रचार चालवला आहे. खासदार बारणे यांनी गेल्या दहा वर्षांत मावळ लोकसभा मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यात काम केलेले असताना त्यांनी कामच केले नाही अशी टीका करणाऱ्या विरोधकांना हा मतदारसंघच माहीत नाही, असे म्हणावे लागेल.**
>
> **–महेंद्र थोरवे, आमदार**

### जनता महायुतीच्या पाठीशी –आमदार प्रशांत ठाकूर



या वेळी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आपल्या भाषणात म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलतात ते करून दाखवतात. त्यामुळे लोकांच्या मनात त्यांच्याविषयी विश्वास आहे. राज्यातही जनतेच्या मनात असलेले ओळखून ते देण्याची क्षमता असलेले सरकार आहे. त्यामुळे देशातील व राज्यातील जनता महायुतीच्या पाठीशी आहे. महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य मिळवून देण्यासाठी मतदारसंघातील सहाही आमदारांमध्ये स्पर्धा लागली आहे. त्यामुळे बारणे यांना विक्रमी मताधिक्य मिळेल यात शंकाच नाही.

## छत्तीसगडमध्ये टॉप कमांडरसह २९ नक्षलवाद्यांचा खात्मा

**रायपूर : वृत्तसंस्था**

देशभर लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना छत्तीसगडच्या कांकेरमध्ये पोलीस आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली. यामध्ये २९ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले आहे, तर तीन जवान जखमी झाले आहेत.

पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि जिल्हा राखीव रक्षक (डीआरजी) यांचे संयुक्त पथक नक्षलविरोधी मोहिमेवर असताना छोटे बेथिया पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात गोळीबार सुरू झाला. गोळीबारात तीन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले, तर अनेक नक्षलवादी ठार झाले आहेत.



पोलीस अधीक्षक कल्याण अलीसेला यांनी चकमकीत २९ नक्षलवादी ठार झाल्याचे स्पष्ट केले आहे. नक्षलवाद्यांचा टॉप कमांडर शंकर रावही मारला गेल्याचे त्यांनी सांगितले. त्याच्यावर २५ लाखांचे इनाम होते. घटनास्थळावरून शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली असून जखमी जवानांना जंगलातून बाहेर काढण्यासाठी अतिरिक्त फौजफाटा पाठवण्यात आला आहे.

## पालघरमध्ये तरुणीचा उष्माघाताने मृत्यू

**पालघर : प्रतिनिधी**

राज्यात तापमानाचा पारा वाढत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशातच पालघरमध्ये एका तरुणीचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि.१६) घडली.

अश्विनी विनोद रावते (वय १६, केव वेडगेपाडा, ता. विक्रमगड, जि.पालघर) असे या तरुणीचे नाव असून ती इयत्ता अकरावीच्या वर्गात शिकत होती. अश्विनी अकरावीचा पेपर देऊन घरी परतल्यानंतर घरी कोणी नसल्याने आई–वडिलांना शोधण्यासाठी नदीवर गेली होती. तिचा मृतदेह शेताजवळ आढळून आल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## युपीएससी परीक्षेत आदित्य श्रीवास्तव देशात पहिला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (युपीएससी) निकाल जाहीर झाले असून आदित्य श्रीवास्तव देशात पहिला आला आहे. द्वितीय क्रमांक अनिमेश प्रधान याने, तर तृतीय क्रमांक डोनुरू अनन्या रेड्डीने मिळवला आहे.

यंदा युपीएससीच्या परीक्षांमध्ये १०१६ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ३४७ उमेदवार खुल्या प्रवर्गाचे, ११५ उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे, ३०३ उमेदवार ओबीसी प्रवर्गाचे, १६५ उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गाचे, तर ८६ उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आहेत.



या परीक्षेत महाराष्ट्रातील मराठी उमेदवारांनी आपला दबदबा कायम ठेवला आहे. अर्चित डोंगरे (१५३ रँक), अनिकेत हिरडे (९१ रँक), प्रियांका मोहिते (५९५ रँक) यांनी यश मिळवले आहे. परीक्षेचा निकाल संकेतस्थळांवर सविस्तर निकाल उपलब्ध आहे. निकालपत्र डाऊनलोड करण्याचाही पर्याय तेथे देण्यात आला आहे.

## निवडक

### मुंबई गोळीबार प्रकरणातील आरोपींना पोलीस कोठडी

**मुंबई** : बॉलीवूड अभिनेता सलमान खान याच्या घराबाहेर झालेल्या गोळीबारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींना २५ एप्रिलपर्यंत म्हणजेच १० दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. विकी गुप्ता आणि सागर पाल अशी दोघांची नावे असून त्यांना गुजरातच्या कच्छमधून ताब्यात घेण्यात आले आहे. हे दोघेही दोन वर्षांपासून बिश्नोई गँगसाठी काम करीत होते आणि गेल्या एक महिन्यापासून पनवेलमधील हरिग्राम येथे भाड्याने राहत होते.

### रोहा जादूटोणाप्रकरणी आरोपीला मुंबईतून अटक

**धाटाव** : रोहा पोलीस ठाणे हद्दीत २०२३ साली अघोरी विद्येचा प्रकार घडला होता. यामध्ये फरारी असणाऱ्या आरोपीला मुंबई वांद्रे येथून अटक करण्यात आली आहे. मोहम्मद इसराइल ऐनुल उल हक रिजवी (वय ५५) असे आरोपीचे नाव आहे. त्याला रोहा पोलिसांनी गुप्त बातमीदारमार्फत मोबाईल क्रमांक प्राप्त करून तसेच तांत्रिक विश्लेषण करून त्याच्या ऑफिसमधून स्थानिक पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. या प्रकरणी रोहा पोलीस अधिक तपास करीत आहेत. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## आपटा ग्रामपंचायतीमध्ये ठाकरे गटासह महाविकास आघाडीला जोरदार धक्का

### ■ सरपंचाविरोधात अविश्वास ठराव मंजूर

**रसायनी : बी. एस. कुलकर्णी**

पनवेल तालुक्यातील व उरण विधानसभा मतदारसंघातील आपटा ग्रामपंचायतीच्या उद्धव ठाकरे गटाच्या सरपंच नाजनिन खलील पटेल यांच्या विरोधातील अविश्वास ठराव मंजूर झाला आहे. सरपंच नाजनिन पटेल यांच्या विरोधात १० मते, तर बाजूने केवळ तीन मते पडली.





गेली अनेक वर्षे आपटा ग्रामपंचायतीवर शेकाप व अलिकडे काही वर्षे ठाकरे गट पर्यायाने महाविकास आघाडीचे वर्चस्व राहिले आहे, पण आता ही ग्रामपंचायत भारतीय जनता पक्षाच्या बाजूने झाली आहे.

नाजनिन खलील पटेल यांच्या मनमानी कारभाराविरोधात ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांमध्ये नाराजी होती. याची दबक्या आवाजात, पण मोठी चर्चा होती. त्यामुळे अविश्वास ठराव मांडण्यात आला आणि नाजनिन पटेल यांच्यावर सरपंचपदावरून पायउतार होण्याची नामुष्की आली.

अविश्वास ठरावावर घेण्यात आलेल्या मतदानावेळी अप्पर तहसीलदार इंगळे, मंडल अधिकारी कारेगावकर, ग्रामविकास अधिकारी गणेश गायकर तसेच पोलीस, पोलीस पाटील उपस्थित होते. त्याचप्रमाणे भाजप नेते, माजी जि.प.सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजप केळवणे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, प्रवीण काळबागे, राजू पाटील, विद्याधर जोशी, दत्ता पाटील, ॲड. निलेश हातमोडे, ॲड. आकाश, ज्ञानेश्वर भोईर, दर्शन भोईर, लक्ष्मण बावधने, राजा देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते.

या वेळी भाजप नेते ज्ञानेश्वर घरत यांनी, आपटा येथे आता आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल सुरू झाली असून भाजपचे काम वेगाने वाढत आहे, असे सांगितले.

## भाजपने देशात ४५पेक्षा जास्त जागा जिंकल्या तर राजकारण सोडाल का?

### भाजप नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांचे उद्धव ठाकरेंना आव्हान

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपने देशात ४५पेक्षा अधिक जागा जिंकल्यास तुम्ही राजकारण सोडाल हा मर्दाचा शब्द द्या आणि महाविकास आघाडीने राज्यात १८हून अधिक जागा जिंकल्यास मी राजकारण सोडेन, असे थेट आव्हान भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी मंगळवारी (दि.१६) दिले.

राज्यात महाविकास आघाडी ४८ जागा जिंकेल, तर भाजप देशात ४५ जागा तरी जिंकेल का या उद्धव ठाकरे यांनी केलेल्या विधानाचा आमदार शेलार यांनी खरपूस समाचार घेतला

याबाबत माध्यमांना प्रतिक्रिया देताना आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले की, हे उद्धव ठाकरे यांचे विधान रेकॉर्ड करून ठेवा. उद्धव ठाकरेजी तुम्ही मर्दांचा पक्ष चालवत असाल, मर्द आणि मर्दांचे नेतृत्व करीत असाल तर तुम्हाला माझे जाहीर आव्हान आहे. भाजपने देशात ४५पेक्षा जास्त जागा जिंकल्या, तर उद्धव ठाकरेजी तुम्ही राजकारण सोडाल, असा मर्दांचा शब्द द्या आणि महाराष्ट्रात



तुम्ही आमच्यामुळे गेल्या वेळी १८ जागा जिंकल्या होतात. या वेळी तुम्ही महाआघाडी म्हणून जर १८च्या वर गेलात तर मी राजकारण सोडेन.

दरम्यान, ठाकरे गटाच्या गाण्याविषयी माध्यमांनी विचारले असता ती मशाल आहे की आईस्क्रिमचा कोन आहे? लोकांना आता या उकाड्यामध्ये आईस्क्रिमचा कोन पाहिजे, मशाल नकोय. मशाल, तिची आग आणि धग याला लोक आता कंटाळतील, असा टोला आमदार शेलार यांनी लगावला

उद्धवजी असत्य बोलले आहेत. अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद त्यांना देण्याबाबत चर्चा झाल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे नाही. याबाबत अमितभाई कधी म्हणाले नाहीत. अडीच वर्षांचा मुद्दा देवेंद्रजीही कधी म्हणाले नाहीत. साधा नियम आहे की, त्या खोलीमध्ये जर दोनच व्यक्ती असतील तर त्यांच्या म्हणण्यानुसार यामध्ये दोनच व्यक्ती बोलू शकतात. उद्धवजी म्हणतात, ते अमित शाह म्हणत नाहीत, कारण उद्धवजी खोटे बोलत आहेत. वादापुरते खरे मानले तरी अशा परिस्थितीमध्ये मी वकील असल्यामुळे युक्तीवाद करतो, जर दोन व्यक्ती आपापल्या वाक्यावर ठाम असतील तर अशा परिस्थितीमध्ये परिस्थितीजन्य पुरावा, समर्थनार्थ आहे का तो पाहिला जातो. असा कुठलाही पुरावा उद्धव ठाकरे यांच्याकडे नाही. ते प्रचारात असताना नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातच सरकार बनेल, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील असे जाहीर केले गेले होते, त्या सभांना स्वत: उद्धव ठाकरे उपस्थित होते आणि त्याला कुठेही आक्षेप घेतलेला दिसून येत नाही. त्यामुळे उद्धव ठाकरेच खोटे बोलत असून स्वत:चे खोटे पचवण्याचा हा प्रयत्न आहे, असेही आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले. **(पान २ वर..)**





**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी महापालिका प्रभाग क्रमांक १९मध्ये सोमवारी प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गणपती मंदिरात श्रीफळ वाढवून या प्रचाराला सुरुवात झाली. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, माजी पं. स. सदस्य निलेश पाटील, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, राष्ट्रवादीचे शिवदास कांबळे, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, संजय भगत, केदार भगत, संजय जैन, पवन सोनी, सपना पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)

## इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीतेंकडे आठ कोटी १९ लाखांची मालमत्ता

**अलिबाग : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे नेते व माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी रायगड लोकसभा मतदारसंघातून इंडिया आघाडीचे उमेदवार म्हणून सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. निवडणूक आयोगाला सादर केलेल्या शपथपत्रात त्यांनी आपल्याकडे आठ कोटी १९ लाख ५९ हजारांची मालमत्ता असल्याचे नमूद केले आहे.

गीते यांनी २०१९ निवडणूक आयोगाला सादर केलेल्या शपथपत्रात त्यांच्याकडे जंगम मालमत्ता एक कोटी ७४ लाख ८८ हजार असल्याचे जाहीर केले होते. यात प्रामुख्याने



बँक खात्यातील ठेवींचा आणि गुंतवणुकीचा समावेश होता. त्या वेळी त्यांच्याकडे पाच कोटी ४४ लाख ३३ हजार रुपयांची स्थावर मालमत्ता होती, ज्यात मुंबई आणि रत्नागिरी जिल्ह्यातील मालमत्तांचा समावेश होता तसेच दोन कोटी १३ लाख रुपयांची दायित्वाचा समावेश होता.

गीते यांनी उमेदवारी अर्ज भरताना दिलेल्या शपथपत्रात २०२४मध्ये त्यांच्याकडे दोन कोटी ३४ लाख २० हजार रुपयांची जंगम मालमत्ता असल्याचे नमूद केले आहे. म्हणजेच गेल्या वेळेसच्या तुलनेत या वेळी त्यांच्या मालमत्तेत ५९ लाख ३२ हजार रुपयांची वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यांनी या वेळी पाच कोटी ८५ हजार ३८ हजार रुपयांची स्थावर मालमत्ता असल्याचे जाहीर केले आहे. गेल्या वेळेसच्या तुलनेत स्थावर मालमत्तेमध्ये ४१ लाख रुपयांची वाढ झाल्याचे दिसून येत आहे, तर पुन्हा एकदा दोन कोटी १३ लाख रुपयांचे दायित्व कायम असल्याचा उल्लेखही निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात दिसून येत आहे.

# काँग्रेसच्या विशाल पाटील यांनीही ठोकले शड्डू

## सांगलीत शक्तीप्रदर्शन करून अपक्ष अर्ज दाखल | जयंत पाटील, चंद्रहार पाटील यांच्या टीकेला प्रत्युत्तर

**सांगली : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीमध्ये सांगली लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू आहे. ठाकरे गटाने पैलवान चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केली असून आता काँग्रेसच्या विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि.१६) शक्तीप्रदर्शन केले. या वेळी विशाल पाटील यांनी भावनिक भाषण केले तसेच शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील तसेच ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले.



जयंत पाटील यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत बोलताना, 'दादा-बापू हा चाळीस वर्षांपूर्वीचा जुना वाद उकरून काढून काही लोक समाजमाध्यमातून टीका-टिपण्णी करून पेटविण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र इतिहासातील घटनांचा विचार करून भविष्यातील कल्पनांना मूठमाती देऊ नये या मताचा मी आहे, असे म्हटले होते.

यावर विशाल पाटील म्हणाले की, मी या वेळी ठरवले कोणाच्या वादात जायचे नाही. काल कोणीतरी बोलले जुना वाद अजून आहे. वसंतदादांनी सांगितले होते की, ज्या दिवशी राजारामबापू वारले त्या दिवशी वाद संपला. आमच्या दृष्टीने ज्या दिवशी राजारामबापू वारले त्या दिवशी वाद संपलेला आहे. तुमच्या मनात अजून वाद असेल तर तो तुम्ही संपवावा. आमच्याकडून यापुढे वादाची भावना असणार नाही.

आम्ही आज येत असताना राजारामबापू यांच्या पुतळ्याला नमन करून आशीर्वाद घेऊन मंचावरसुद्धा त्यांचा फोटो लावून या ठिकाणी प्रचाराला शुभारंभ केला आहे. हा वाद मिटल्याचे विशाल पाटील यांनी सांगितले.

ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी उमेदवारीवरुन विशाल पाटील यांच्यावर टीका केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देताना, काल कोणीतरी आरोप केला शेतकऱ्याचा मुलगा खासदार झालेला पाहवत नाही का? या वसंतदादा घराण्याने शेतकऱ्यांच्या मुलांना पद द्यायचे काम केले आहे. आमचीही तीच भावना आहे की शेतकऱ्याच्या मुलाने आमदार, खासदार झाले पाहिजे, पण शेतकऱ्याच्या मुलाला फसवून त्याचा बळी नाही गेला पाहिजे हीसुद्धा पहायची आमची जबाबदारी आहे, असा टोला विशाल पाटील यांनी लगावला.

त्या पैलवानांना माझी विनंती आहे, राऊतसाहेब आधीच येऊन गोंधळ घालून गेलेत. सांगली सुसंस्कृत आहे. इथं भाषा शोभणारी बोलावी. आपल्यावर खूप चांगले संस्कार आहेत. त्यांच्या पुस्तकातील शब्द आणि भावना वापरून लोक आणि चिडीला पेटतील. त्यामुळे आता राजकारण करायचे असेल तर भाषा सांभाळून करायची. ज्या शिवसेनेला आवाज वसंतदादांनी घडवला तोच आवाज आता त्याच वसंतदादांच्या विरोधात वापरला जातोय हे दुर्दैवी आहे, पण आम्हाला याचे भान आहे, असेही विशाल पाटील म्हणाले.

# अशक्य गोष्टी आम्ही शक्य करून दाखवल्या -पंतप्रधान मोदी

**पूर्णिया (बिहार) : वृत्तसंस्था**

गेल्या १० वर्षांत एनडीए सरकारने अशा गोष्टी केल्या आहेत, ज्या पूर्वी अशक्य मानल्या जात होत्या. आज प्रत्येकजण म्हणतोय मोठी कामे करण्याची ताकद केवळ भाजपमध्ये आहे. पूर्वी शेजारचे देश हल्ले करून निघून जायचे. सीमेवर अशांतता होती. लोकांना दुःखासोबतच संतापही व्यक्त करीत होते. यांच्या घरात घुसून मारायला हवे, असे तुम्हाला वाटत होते. मोदीने तुमची इच्छा पूर्ण केली. जो देश डोळे वटारत होता, आज कटोरा घेऊन भटकत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. ते मंगळवारी (दि.१६) बिहारमधील पूर्णिया येथे एका प्रचार सभेला संबोधित करत होते.



तुमची इच्छा होती की काश्मीरमधून कलम ३७० हटायला हवे, मात्र ३७० हटवल्यास काश्मीरात आग भडकेल, असे अहंकारी आघाडीवाले म्हणत होते. आज कलम ३७० हटले आहे आणि काश्मिरात नाही, तर भारताला तोडू इच्छिणाऱ्यांच्या मनसुब्यांना आग लागली आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर हल्ला चढवला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, संविधानाच्या नावाखाली जे लोक आम्हाला रात्रंदिवस शिव्या देत आहेत, त्यांच्या हातात स्वातंत्र्यानंतरही आतापर्यंत सत्ता होती, मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जम्मू-काश्मीरमध्ये लागू करण्याची त्यांची हिंमत नव्हती. तेथे बाबासाहेबांचे संविधान लागू होत नव्हते. हा मोदी आहे, जो संविधानाला समर्पित आहे. आज जम्मू-काश्मीरमध्येही आपले संविधान मोठ्या थाटात लागू झाले. सीएएला विरोध करणाऱ्यांना इशारा देत पीएम मोदी म्हणाले, हा मोदी आहे, ना भितो, ना झुकतो.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, देशातील २५ कोटी लोक गरिबीतून तेव्हा बाहेर आले, जेव्हा आम्ही त्यांच्यासाठी रात्रंदिवस काम केले. देशातील चार कोटी गरीब लोकांना पंतप्रधान आवास तेव्हा मिळाले, जेव्हा तुम्ही मोदींना सेवा करण्याचा आशीर्वाद दिला. भाजपने पुढील पाच वर्षांसाठी आपले संकल्प पत्र प्रसिद्ध केले आहे. त्यात मोदीची गॅरेंटी आहे. भविष्यातही देशातील सर्व गरजूंना गरीबांना मोफत रेशन मिळेल. गरीब, दलित आणि वंचितांसाठी केलेल्या योजना प्रत्येक गरजूपर्यंत पोहचवल्या जातील. एवढेच नाही, तर सरकार तीन कोटी नवी पक्की घरेही बांधणार आहे.

# पनवेलमधून देशी बनावटीच्या अग्निशस्त्रासह एकजण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

अभिनेते सलमान खान यांच्या मुंबई येथील निवासस्थानी गोळीबार करणारे दोघे जण पनवेल तालुक्यात वास्तव्यास होते. याच पार्श्वभूमीवर व लोकसभा निवडणुकीनिमित्त पोलिसांचा तपास सर्वत्र सुरू आहे. पनवेल शहर पोलिसांनी एका तरुणाला देशी बनावटीच्या अग्नीशस्त्रासह पाच जीवंत काडतुसे जवळ बाळगल्याप्रकरणी ताब्यात घेतले आहे.




पनवेल एसटी स्टँडच्या मागील बाजूस पनवेल रेल्वेस्टेशनच्या दिशेने एक जण अग्निशस्त्र घेऊन येणार असल्याची पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे यांना बातमीदाराकडून मिळाल्याने त्यांनी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल रेल्वे स्टेशन व एसटी स्टँड परिसरात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, उपनिरीक्षक विनोद लबडे, हवालदार परेश म्हात्रे, नितीन वाघमारे, शिपाई प्रसाद घरत, कॉन्स्टेबल विशाल दुधे यांनी पाळत ठेवून अग्निशस्त्र घेऊन येणारा पवन जसवंत सागर (वय १८, रा. गाजियाबाद) यास ताब्यात घेतले.

त्याच्याकडे देशी बनावटीचे अग्निशस्त्र व पाच जिवंत काडतुसे मिळाल्याने त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा करण्यात आला आहे.

## नेरळ हुतात्मा चौकात मोराचा मृत्यू

**कर्जत** : नेरळ येथील हुतात्मा चौक परिसरातून टाटा कंपनीची वीजवाहिनी जाते. त्या भागातील फॉरेस्ट टेकडी आणि मोरोशी भागात मोठ्या प्रमाणात मोरांचा संचार असतो. त्यातील एका मोराचा वीजवाहिनीला धडक लागल्याने त्या मोराचा मृत्यू झाला. मोर आपला राष्ट्रीय पक्षी असल्याने त्याच्यावर शासकीय नियमानुसार अंतिम विधी केले जाणार आहेत.



फॉरेस्ट टेकडी येथून हा मोर मोरोशी भागाकडे जात असताना तेथून वाहणाऱ्या टाटा कंपनीच्या वीज वाहक तारा यांना धडक लागली. त्या धडकेत निळ्याशार मोर पिसांचा मोर धाडकन जमिनीवर कोसळला. त्या वेळी ग्रामपंचायत कर्मचारी बाळू लिये आणि टॅक्सी संघटनेचे कार्यकर्ते किशोर भोईर यांनी वनविभागाला माहिती दिली. त्यानंतर तत्काळ वनकर्मचारी घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी मोराला उचलून टॅक्सी स्टँड कार्यालयात आणले.

# अघोरी प्रकार करणाऱ्या आरोपीला अटक

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाणे हद्दीत २०२३साली अघोरी विद्येचा प्रकार घडला होता. याविषयी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस तपासांतर्गत पोलिसांना मिळालेल्या माहितीद्वारे आरोपीचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून, तसेच त्याचे तांत्रिक विश्लेषण करून फरारी असणाऱ्या आरोपीला बांद्रा मुंबई येथे अटक करण्यात आली आहे.



आरोपी मोहम्मद इसराइल ऐनुल उल हक रिजवी (वय ५५, रा. आशियाना अपार्टमेंट, बांद्रा ईस्ट, मुंबई) याला रोहा सपोनि ऐदाळे, बेल्हेकर, पाटील यांनी गुप्त बातमीदारमार्फत बांद्रा कोर्ट, येथील त्याचे ऑफिसमधून तेथील स्थानिक पोलिसांचे मदतीने अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय अधिकारी रोहा शैलेश काळे व पोलीस निरीक्षक मुपडे यांच्या अधिपात्याखाली करवाई केली.

## गव्हाण विद्यालयात काईंडनेस विषयावर समुपदेशन

**गव्हाण** : रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये एडबीज कंपनीच्या वतीने काईंडनेस विषयावर समुपदेशन करण्यात आले.

अश्विनी नाईक, किर्ती कदम व प्रितम पवार यांनी मनाच्या सकारात्मकतेवर होणारे दुष्पपरिणाम व ते दूर करण्यासाठी घ्यावयाची काळजी याचे प्रभावी प्रात्यक्षिकाद्वारे समुपदेशन केले. शिबिरात अश्विनी नाईक यांनी काईंडनेस शिबिराची ओळख यावर व्याख्यान दिले. किर्ती कदम यांनी डायव्हर्सिटी अर्थात वेगळेपण असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या सहमतीने मदत करण्याविषयी विशेष मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सेशनमध्ये प्रितम पवार यांनी मानवी स्वभावातील चिडचिडेपणा व घ्यावयाची काळजी या विषयावर समुपदेशन करताना संयमित भाषा व समजावण्याचा सूर, बोलण्याच्या पद्धती याविषयी शिक्षकांना बोलते करून समस्या सोडविण्यासाठी स्वतःहून हिंमतीने पुढे येण्याची आवश्यकता अधोरेखित केले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे यांच्यासह सर्व अध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर रंधवे यांनी केले.



# पनवेलमध्ये मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी नुकतीच कळंबोलीमध्ये बचतगटाच्या महिलांनी रॅलीचे आयोजन केले होते. पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये मंगळवारी (दि.१६) ग्रामीण व शहरी भागांमध्ये विविध ठिकाणी प्रभात फेरी, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. आशासेविकांनी रॅली व बैठका घेऊन मतदान जनजागृती केली.

## आशासेविकांच्या बैठका, बचत गटाची रॅली

लोकसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी मावळ लोकसभा मतदारसंघामधील पनवेल विधानसभा मतदारसंघांतील महापालिका कार्यक्षेत्र तसेच पनवेल ग्रामीण भागात केली जात आहे. आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व स्वीप पथक प्रमुख अधिकारी मुख्य अभियंता संजय जगताप गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत.

दरम्यान, मतदान जनजागृतीसाठी कळंबोलीमध्ये नुकतीच बचत गटाच्या महिलांनी रॅलीचे आयोजन केले. या रॅलीमध्ये पोस्टर, बॅनर हातामध्ये घेऊन सुमारे २०० महिलांनी सहभाग घेतला. मावळ लोकसभा सार्वत्रिक निवडणूक १८८ पनवेल विधानसभा मतदार संघात आदिवासी नागरिकांमध्ये कातकरी वाडी (तक्का वसाहत), पनवेल येथेही मतदान जनजागृती करण्यात आली, तसेच किरवली तळोजा मजकूर येथे आशा सेविकांनी रॅली तसेच बैठकांच्या माध्यमातून मतदान जनजागृती केली. सिध्दार्थ मल्टिपर्पज हायस्कूलमध्ये स्वीप कार्यक्रम अंतर्गत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.

बागबान इंग्लिश मिडीयम तळोजामध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. रायगड जिल्हा परिषद नेरे शाळा, भानघर शाळा, वलप शाळा, वांगणी शाळा, शिरवली शाळांतील विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून मतदान जनजागृती केली.

कामोठ्यामधील डीजी गोसावी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले तसेच एमएनआर स्कूल कामोठ्यामधील विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

पान १ वरुन

## विरोधकांकडे सांगण्यासारखे काहीच नाही

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर येऊन तेथील पवित्र माती डोक्याला लावणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्थान अधिक मजबूत करण्यासाठी मावळ मतदारसंघातील मावळा दिल्लीला गेलाच पाहिजे, असे प्रतिपादन भाजप नेते बाळासाहेब पाटील यांनी केले. शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी प्रास्ताविक केले. जितेंद्र पाटील, नरेंद्र गायकवाड, भरत भगत आदींचीही या वेळी भाषणे झाली. या बैठकीला महायुतीच्या मित्र पक्षांचे पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपने देशात ४५पेक्षा जास्त जागा जिंकल्या तर राजकारण सोडाल का?

सुसंस्कृत महाराष्ट्रात घरात आलेल्या सुनेला मुलगी मानले जाते. तिच्या रूपाने लक्ष्मी घरात आली हा आदर केला जातो, मुलीएवढंच प्रेम तिच्यावर केले जाते. आपल्या वक्तव्याने पवारसाहेबांनी तमाम मराठी आणि महाराष्ट्र संस्कृतीवर प्रेम करणाऱ्या समस्त मतदारांचे मन दुखावले आहे, असेही आमदार अ‍ॅड. शेलार यांनी या वेळी म्हटले.

# के.गो. लिमये वाचनालयात वसंतोत्सव व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या वतीने शनिवारी (दि. १३) संस्थेमध्ये वसंत व्याख्यानमाला आयोजित केली होती. संस्थेचे कार्यवाह काशिनाथ जाधव यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅड. सुनिता जोशी यांच्या स्त्री संत कवयित्री आणि त्यांचे काव्य या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. तरुजा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणात संत मुक्ताबाई, मीराबाई, जनाई बहिणाबाईपासून आधुनिक काळातील पनवेलमधील ललीतामाई यांचेपर्यंत त्यांची समाजाकडून होणारी अवहेलना, त्यांचे जगण्याचे ध्येय अगदी ओघवत्या भाषा शैलीत सांगून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. पाहुण्यांचे स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष श्याम वालावलकर यांनी स्वागत केले.



प्रमुख पाहुण्यांचा परिचय अ‍ॅड. माधुरी थळकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिमालिनी कुलकर्णी यांनी केले. अ‍ॅड. थळकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वसंत व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प प्रवास गडकिल्ल्यांचा या विषयावर सुखद राणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्ष अ‍ॅड. सुनिता जोशी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार अ‍ॅड. माधुरी थळकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय रोहिदास पोटे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता गांधी यांनी केले. सुखद राणे यांनी देशभरातील गड किल्ल्यांविषयी माहिती देताना रायगड जिल्ह्यातील ५९ किल्ल्यांची सविस्तर माहिती सांगितली. आजपर्यंत माहित नसलेल्या गड किल्ल्यांची सफर घडवून आणली व स्वलिखित इये देशीचे दुर्ग (ओळख रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांची) हे एक पुस्तक वाचनालयास भेट म्हणून दिले. सुनील खेडेकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. संस्थेचे कोषाध्यक्ष प्रकाश पाटील उपस्थित होते. या वेळी वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दुखवटा

### किसन पाटील

**उरण** : पनवेल तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, कलाकार किसन चंदर पाटील यांचे शुक्रवारी (दि.१२) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८६ होते. त्यांची अंत्यविधी वहाळ येथील स्मशानभूमीत झाले. त्यांच्या अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचे दहावे श्री क्षेत्र लांगेश्वर मोरावे येथे, तर उत्तरकार्य २४ एप्रिल रोजी त्यांच्या राहत्या घरी वहाळमध्ये होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन बहिणी, तीन मुले, दोन मुली, नातू, नाती असा परिवार आहे.



# खासदार बारणेंच्या विजयासाठी पनवेलमध्ये जोरदार प्रचार

## आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सहभाग





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ पनवेल परिसरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी उत्साहात प्रचार करत आहेत, तर सोमवारी पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९मध्ये प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गणपती मंदिरात पनवेल महानगर पालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात करण्यात आली.

लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून मावळ मतदार संघात भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांना पनवेल विधानसभा मतदारसंघातून जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून



आणण्यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. त्या अनुषंगाने कार्यकर्ते घरोघरी जाऊन महायुतीचा प्रचार करत आहेत. यानिमित्ताने दिवसभरातील प्रचाराच्या समाप्तीच्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रभाग क्रमांक १६मधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून, घरोघरी प्रचार करण्याकरिता सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, माजी नगरसेवक समीर ठाकूर, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, माजी नगरसेविका संगिता कांडपाल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक १९मध्ये प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, संजय भगत, केदार भगत, संजय जैन, पवन सोनी, सपना पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





**लोणावळा : आगरी-कोळी समाजाचे कुलदैवत असणाऱ्या एकविरा देवीच्या पालखी सोहळ्याचा मान या वर्षी पनवेल कोळीवाड्याला मिळाला. यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्ला येथे जाऊन पालखीचे दर्शन घेतले. या वेळी हरू भगत यांच्यासह कोळीवाड्यातील ग्रामस्थ उपस्थित होते.**

## वाहनचालकांना सुरक्षिततेचे धडे

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरातील दुचाकी व चारचाकी वाहनांवरील चालकांना वाहतूक शाखेतर्फे सुरक्षिततेचे धडे देण्यात आले.

यामध्ये प्रामुख्याने दुचाकी वाहन चालकाने डोक्यात हेल्मेट घालावे, दुचाकीवरुन दोघा जणांनी प्रवास करावा, वाहतुकीचे नियम पाळावे, त्याचप्रमाणे चार चाकी वाहन चालकांनी सिट बेल्ट लावावा, वाहनांवर नियंत्रण ठेवावे आदी प्रकारचे प्रबोधन व सुरक्षिततेचे धडे वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भादरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिले.

या उपक्रमाचे कामोठेवासियांनी स्वागत केले असून वाहतुकीचे नियम पाळण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे.





## एनएमएमएस परीक्षेत गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थिनींचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय स्तरावरील एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील नंदिनी कृष्णा कोळी व अविका शैलेंद्र कोळी या दोन विद्यार्थिनींनी यश संपादन केले असून त्या शिष्यवृत्तीधारक ठरल्या आहेत.

भारत सरकारतर्फे नंदिनी व अविका या विद्यार्थिनींना पुढील सलग चार वर्षे प्रतिवर्षी प्रत्येकी १२००० (१२वी पर्यंत) म्हणजे प्रत्येकी एकूण ४८००० रुपयांची स्कॉलरशिप प्राप्त होणार आहे.

या दोघींच्या यशाबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत,



नंदिनी कृष्णा कोळी | अविका शैलेंद्र कोळी

'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, जुनिअर कॉलेजचे प्रमुख बाबुलाल पाटोळे, आदींनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणाऱ्या विभागप्रमुख वृषाली म्हात्रे यांचेही अभिनंदन होत आहे.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. १६) स्टाफ वेल्फेअर व ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी कोकण दर्पण वृत्तपत्राचे मुख्य संपादक श्री संजय महाडिक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले व त्यांनी



त्यांच्याविषयी विचार मांडले तसेच महाविद्यालयातील प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व सर्व विभागाचे विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी महाविद्यालयांमध्ये उपस्थित राहून त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली.

या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील समन्वयक स्टाफ वेल्फेअर कमिटी व ग्रंथपाल श्री वैभव झगडे यांनी केले तसेच इतर सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये रस्ता सुरक्षा मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये मंगळवारी (दि. १६) रस्ता सुरक्षा जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहाय्यक प्रादेशिक परिवहन पनवेल विभाग अधिकारी सचिन विधाते हे उपस्थित होते तर यांच्यासोबत मोटार वाहन निरीक्षक (पनवेल विभाग) रविकिरण भट, सहाय्यक मोटार वाहन विभाग निरीक्षक (पनवेल विभाग) विजया चामे उपस्थित होते. या वेळी विजया चामे यांनी विद्यार्थ्यांना वाहन चालवण्याची वयोमर्यादेपासून ते वाहन चालवण्याचे नियम, वाहन चालवताना केलेल्या निष्काळजीपणा कसा होतो त्याबाबतीत असणारी दंड नियमावली याबाबत सखोल मार्गदर्शन केले. वेळप्रसंगी काय कारवाई होऊ शकते या बाबत जागरूक केले. त्यांनतर प्रमुख मार्गदर्शक सचिन विधाते यांनी अपघात कसा होतो याबाबत विडिओ दाखवून मार्गदर्शन केले व प्रेसेंटेशन सादर केले. ज्यामध्ये रस्त्यावरील सांकेतिक चिन्ह, रस्त्यावर वाहचालकांमार्फत करण्यात आलेल्या हात वारे बाबत माहिती सांगितली.

यासोबतच रस्त्यावर सायकल चालविताना किंवा वाहन चालवीतना काय काळजी घ्यावी वळण कसे घ्यावे अपघात होऊ नये यासंबधी मैदानावर ट्रॅकमार्फत प्रात्यक्षिक दाखवून जागरूक केले. ज्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी एक सायकल प्रात्यशिकाचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांना खुप महत्वपूर्ण माहिती मिळाली. यांनतर स्कुलच्या मुख्याध्यापिका मुक्ता भानुदास खटावकर यांनी मार्गदर्शकांचे आभार मानले.



## प्रामाणिक रिक्षाचालकाचे कौतुक

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षात सापडलेला मोबाईल फोन प्रामाणिकपणे पनवेल शहर पोलीस स्टेशनला आणून दिल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी रिक्षाचालकाचे कौतुक केले आहे.

संदीप काळुराम पाटील (रा. पारगाव) असे या रिक्षाचालकाचे नाव असून त्याची रिक्षा (एमएच ४६ एझेड ७५८४) या रिक्षात पनवेल एसटी स्टॅन्ड समोरील रिक्षा थांब्यावर महिला पोलीस कॉन्स्टेबल वर्षा गणेश पाटील या सकाळी बसल्या व पनवेल शहर पोलीस ठाण्यात आल्या या प्रवासादरम्यान त्यांचा मोबाईल रिक्षाच्या मागील सीटवरील कोपऱ्यात पडला, परंतु ही बाब वर्षा पाटील यांच्या लक्षात न आल्याने त्या घाईघाईने पोलीस ठाण्यात कर्तव्य बजाविण्यासाठी पोलीस ठाण्यात गेल्या काही वेळानंतर रिक्षाचालक संदीप पाटील यांना त्यांच्या रिक्षामध्ये मोबाईल फोन पडल्याचे समजले त्यांनी तातडीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात येऊन फोन जमा केला. तो फोन वर्षा पाटील यांचा असल्याचे निष्पन्न झाले. रिक्षाचालक संदीप पाटील यांच्या प्रामाणिकपणाचे पोलिसांनी कौतुक केले आहे.



**रिक्षाचालकांच्या प्रामाणिकपणामुळे अनेक वेळा रिक्षात विसरलेल्या वस्तू प्रवाश्यांना परत मिळतात, हा प्रामाणिकपणा कौतुकास्पद आहे.**
**-नितीन ठाकरे,**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

## निवडक

### चिरनेरमध्ये रामनवमी उत्सव

**उरण :** चिरनेर मधीलपाडा व तेलीपाडा ग्रामस्थांच्या वतीने सलाबादप्रमाणे १६ एप्रिल ते १८ एप्रिल या कालावधी दरम्यान श्री रामनवमी जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या वेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १७ एप्रिल रोजीच्या मुख्य दिवशी सकाळी सात वाजता प्रभू श्री रामचंद्रांचा अभिषेक होईल. त्यानंतर भजनाचा कार्यक्रम, प्रभू श्री रामचंद्रांच्या जन्माचे किर्तन, पुन्हा भजनाचा कार्यक्रम, रात्री प्रभू श्री रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. १८ एप्रिल रोजी रात्री १० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती चिरनेर मधीलपाडा व तेलीपाडा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली.

### कोपरा परिसरात मृतदेह आढळला

**पनवेल :** खारघर येथील कोपरा हॉटेल निर्सुप पॅलेससमोरील सायन-पनवेल महामार्गावरील मध्यभागी असलेल्या फुटपाथवर अनोळखी व्यक्ती मयत पडून असल्याचे निर्दशनास आले. मच्छिन्द्र पाटील यांनी या संदर्भात तत्काळ खारघर पोलीस ठाण्यात महिती दिली. पोलीस या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. या मृत व्यक्तीचे वर्णन अंदाजे वय ३५, उंची ५.५ इंच, रंग निमगोरा, अंगाने मध्यम, चेहरा गोल, नाक सरळ, दाढी बारीक, डोक्याचे केस काळे पांढरे, अंगात पिवळ्या रंगाची टी-शर्ट कंबरेला राखाडी फूल पॅन्ट परिधान केली आहे. या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे (०२२२७७४२५००) पोलीस उपनिरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कळंबोली वसाहतीमध्ये विविध कार्यक्रम

**पनवेल :** ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज तथा श्री चैतन्य गगनगीरी महाराज यांच्या कृपेने श्री राम सामाजिक विकास मंडळाच्यावतीने श्री राम जन्मोत्सव निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री राम सामाजिक विकास मंडळ, कळंबोली यांनी हा सोहळा आयोजित केला असून हा सोहळा श्री राम मंदिर, एल.आय.जी.-२, सेक्टर-१, कळंबोली येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्याची सांगता १७ एप्रिल रोजी होणार आहे. अधिक माहितीसाठी राम मंदिर जिर्णोध्दार कमिटी अध्यक्ष संतोष मोकल, उपाध्यक्ष सचिन देशमुख, खजिनदार सुशांत कापरे, उपखजिनदार सूरज रजपूत, सेक्रेटरी महादेव क्षीरसागर, उप सेक्रेटरी अनिल रजपूत, हिशोब तपासणीस मयूर रजपूत, प्रमुख सल्लागार संतोष देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.

### विसपुते कॉलेजचा अभ्यास दौरा



**पनवेल :** नवीन पनवेलच्या श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेजमधील शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमातील जवळपास १०० विद्यार्थी महाराष्ट्रातील पानोली, राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार या अभ्यासदौर्यात सहभागी झाले होते. गावाच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षणाबरोबरच महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून बचत गटांद्वारे गोडेतेल आणि आरोचे शुद्ध पाणी, वृक्ष लागवड जलसंधारण अशा अनेकविध विधायक आणि रचनात्मक कामांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. राळेगणसिद्धी येथे अण्णांनी संवाद साधला. पारनेर येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. रफिक सय्यद यांनी चहापान ठेवले होतं. ऑरगॅनिक इंटेलेक्च्युअल पद्मश्री पोपटराव पवार यांचीही भेटी झाली.

### भीम जयंती कार्यक्रम उत्साहात



**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त विविध भीम जयंती कार्यक्रमांच्या उत्सवाला उपस्थिती दर्शविली. पनवेल तालुक्यातील जासई, वडघर, करंजाडे, घोटकॅम्प, देवीचा पाडा, चिंध्रण, काळुंद्रे, बारवई इत्यादी ठिकाणी त्यांनी उपस्थिती दर्शविली. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

### 'रयत माऊली'ची पुण्यतिथी



**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेचे पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य (एमपीएएससी) महाविद्यालयात नुकताच रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुण्यतिथी कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर व प्रमुख पाहुणे मराठी विभागाचे प्राध्यापक प्रवीण गायकर होते. महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. लीना मेश्राम यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ.पवार एन.बी. यांना पी.एच.डी. प्राप्त झाल्याबद्दल व उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील यांना 'फ्रुट पीकर हार्वेस्टिंग गार्ड' या पेटंटसाठी मा. प्राचार्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. डॉ. आर.ए. पाटील यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली कोळी व शरयु नाईक यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने केला.

## संपादकीय

# सडेतोड मुलाखत

निवडणूक रोखे योजना निर्दोष असल्याचा दावा आम्ही कधीच केला नव्हता. तथापि, निवडणुकीत काळ्या पैशाचा वापर होऊ नये यासाठी ही योजना आणण्यात आली होती असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी मुलाखतीमध्ये केले. याच योजनेमुळे रिझर्व्ह बँक आणि संबंधित वित्त संस्थांना निवडणुकीतील पैशाचा मागोवा घेता आला याकडे डोळेझाक करून चालणार नाही असेही ते म्हणाले.

**देशाचे भविष्य ठरवणारी निवडणूक ऐन उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. देशभर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. प्रचार फेऱ्यांपासून समाजमाध्यमांवरील वेड्यावाकड्या शेऱ्यांपर्यंत सारे काही एकाच वेळी घडत असल्याने सामान्य मतदार गोंधळून गेला तर नवल वाटायला नको. निवडणुकीच्या निमित्ताने देशातील वातावरण ढवळून निघाले आहे. मतामतांच्या गलबल्यात आपण कुठल्या दिशेने बघायचे याचा विचार सामान्य मतदार करतच असतो. विरोधकांच्या इंडिया आघाडीने बिनबुडाचे आरोप करून वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला खरा, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे त्यांचे सारेच बाण फुकट गेले. सत्ताधाऱ्यांना जेरीस आणणे हे विरोधकांचे कामच असते. दमदार विरोधी पक्ष असेल तर सत्ताधाऱ्यांवर वचक राहतो. तसेच मतदारांनाही नव्या पर्यायाचा शोध घेणे सोपे जाते. दुर्दैवाने आपल्या देशातील परिस्थिती वेगळी आहे. सत्ताधारी लोकप्रियतेच्या शिखरावर आणि विरोधक अगदी तळाला हीच परिस्थिती आहे. निवडणुकांच्या तोंडावर पंतप्रधान मोदी यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला विस्तृत मुलाखत दिली. त्यामुळे विरोधकांच्या गोटात फारच हादरे बसले असतील. खऱ्याखोट्या प्रचारामुळे सामान्य मतदाराच्या मनात उभे राहिलेले छोटेछोटे प्रश्नदेखील पंतप्रधानांनी या मुलाखतीमध्ये अनुत्तरीत ठेवले नाहीत. जुमलेबाजीपासून तथाकथित निवडणूक रोखे घोटाळ्यापर्यंत सर्वच शंकाकुशंकांना पंतप्रधानांनी कायमची मूठमाती दिली. इलेक्टोरल बाँड्स म्हणजेच निवडणूक रोख्यांच्या खरेदीवरून मध्यंतरी विरोधीपक्षांनी मोठे रण माजवले होते. निवडणूक रोखे योजना पुरेशी पारदर्शक नाही असे परखडपणे सांगून सर्वोच्च न्यायालयाने ती रद्दबातल ठरवली. निवडणूक रोख्यांमध्ये सर्वाधिक लाभ सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला झाला असा विरोधकांचा आरोप आहे. तपासयंत्रणांच्या कारवाईनंतरदेखील काही पंधरा-सोळा कंपन्यांनी भाजपला देणगी देऊन कारवाईतून मान सोडवून घेण्याचा कथित प्रयत्न केला होता अशी टीका झाली. वास्तविक या आरोपात अजिबात तथ्य नाही. अशा ज्या सोळा कंपन्यांनी निवडणूक रोखे घेतले, त्यापैकी फक्त ३७ टक्के रोखे भाजपच्या वाट्याला आले आहेत. उर्वरित ६३ टक्के रोखे विरोधी पक्षांच्या बँक खात्यांमध्ये गेले ही वस्तुस्थिती आहे. पंतप्रधानांच्या मुलाखतीतच ही बाब स्पष्ट झाली हे बरे झाले. निवडणूक रोख्यांमध्ये सर्व पैसा शेवटी बँकेत येतो. म्हणजेच त्या पैशाचा स्त्रोत शोधून काढता येतो. तसेच तो विनिमयात खेळवला जातो. काळ्या पैशासारखा तो कुठल्या नेत्याच्या घराच्या तळघरातील तिजोरीत किंवा कपाटात गायब होत नाही. निवडणूक रोखे योजना नव्हती तेव्हा हाच पैसा नगदी स्वरुपात दिला-घेतला जात असे. मुख्य चलन प्रवाहात त्याचा मागमूस राहात नसे. पंतप्रधानांच्या मुलाखतीमुळे निवडणूक रोख्यांबाबतच्या मोठ्या शंका फिटल्या तसेच काँग्रेसच्या जाहिरनाम्यामधील फोलपणादेखील सपशेल उघड झाला. एका झटक्यात गरीबी दूर करून दाखवतो अशा वल्गना काँग्रेसचे 'शाही जादुगार' राहुल गांधी करत सुटले आहेत अशी टीका मोदींनी केली. भारतीय मतदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हृदयात स्थान का देतात याचे उत्तर या सडेतोड मुलाखतीमधून मिळाले.**

# झोपड्या जमीनदोस्त करून खारघरची ओळख जपली...





**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेल महापालिका हद्दीतील खारघर म्हणजे सिडकोने वसवलेल्या शहरांपैकी एक चांगले शहर. त्याची दुसरी ओळख म्हणजे एज्युकेशन हब, परंतु या शहराच्या लगत सेक्टर ३ मधील बेलपाडा गावाच्या मागील डोंगरावर अचानक अनधिकृतपणे झोपड्या उभ्या राहण्यास सुरुवात झाली. त्यामुळे खारघरसारख्या सुंदर शहराला बकालपणा प्राप्त होऊन खारघरची झोपडपट्ट्यांचे शहर म्हणून नवीन ओळख होईल, अशी शंका सर्वांच्या मनात येऊ लागली होती. सोमवारी महापालिकेने बेलपाडा गावाच्या मागे डोंगरावर अचानक अनधिकृतपणे उभ्या राहिलेल्या ७५ झोपड्या जमीनदोस्त करून नागरिकांना मोठा दिलासा देऊन खारघरची ओळख जपली आहे.

बेलपाडा गावाच्या मागे आणि डोंगराळ भागात या झोपड्या उभ्या राहिल्याने त्या सहज कोणाच्या नजरेत येत नाहीत, त्याचाच फायदा घेऊन काही समाजकंटक या झोपड्या उभारत होते. त्यामुळे काही दिवसातच या शहराची ओळख बदलून गेली असती. या अनधिकृत झोपड्यांमुळे नागरिकांना नाहक त्रासही सहन करावा लागत होता त्यामुळे अशा प्रकारच्या झोपड्यांना हा भूभाग आंदण मिळू नये. त्यांच्याप्रमाणे वाढू नये यासाठी या अनधिकृत

झोपड्यांवर कारवाई होणे आवश्यक असल्याने भाजपचे शहराध्यक्ष माजी नगरसेवक प्रवीण पाटील, ॲड. अमर उपाध्याय आणि कीर्ती नवघरे यांनी महापालिकेचे माजी सभागृह नेते सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे तक्रार करून त्यांना याची माहिती दिली. त्यांनी महापालिकेचे प्रभारी आयुक्त प्रशांत रसाळ आणि प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्याकडे तक्रार करून कारवाई करण्याची मागणी केली.

विकास कामे करण्यासाठी महापालिकेकडे मालमत्ता कर हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन. पनवेल महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आर्थिक वर्षाची वर्ष अखेरअसल्याने त्याची वसूली करण्याचे गरजेचे होते. उच्च न्यायालयाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नसल्याने चारही प्रभागामंध्ये मार्च महिना संपेपर्यंत कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कोणतीही सुट्टी न घेता शनिवार, रविवारीदेखील कार्यालये सुरू ठेवली होती. मार्च महिन्यात एकुण ५२ कोटीची वसुली झाली, त्यामध्ये ३० मार्च या एकाच दिवशी १२ कोटीची विक्रमी वसुली झाली. एकुणच गेल्या वर्षभर मालमत्ता कर विभागाने घेतलेल्या कष्टाचे फळ म्हणजे यावर्षी ३१ मार्च संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ३६० कोटींची सर्वाधिक वसुली महापालिकेने केली.

यातच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने निवडणुकीचे ही काम. यातून वेळ काढून सोमवारी सकाळी प्रभारी आयुक्त प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त मारुती गायकवाड, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, अतिक्रमण विरोधी प्रमुख रत्नाकर जाधव, स्वच्छता निरीक्षक संदीप भोईर, अतुल मोहोकर आणि ५० कर्मचारी यांनी त्या ठिकाणी तीन जेसीबीच्या सहाय्याने अनधिकृत झोपडपट्ट्या जमीनदोस्त करत ती जागा पूर्ववत करून नागरिकांना दिलासा दिला आहे.

### नवीन झोपड्या बांधण्याची कोणी हिंमत करणार नाही -परेश ठाकूर

***छत्रपती शिवाजी महाराज आग्रा येथे अडकले असताना माता जिजाऊंनी स्वराज्याचा किल्ला समर्थपणे सांभाळला. त्यामध्ये एक किल्ला सहभागी करून घेतला, त्याप्रमाणे आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने गेले वर्षभर नियोजनबध्द पध्दतीने रूपरेषा आखून वसूली सुरू होती, पण त्यांची निवडणूक आचारसंहितेमुळे बदली झाली. अशावेळी महापालिकेने प्रभारी आयुक्त प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ३६० कोटींची सर्वाधिक वसुली केली, पण त्याचबरोबर खारघरला बकाल होण्यापासून वाचवण्यासाठी अनधिकृत झोपडपट्टी जमीनदोस्त केली. त्यामुळे आता नवीन झोपड्या बांधण्याची कोणी हिंमत करणार नाही, अशी प्रतिक्रिया माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिली.***

# भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर रोजी जन्मदिन असतो आणि त्यांचा जन्मदिन देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. 'शिक्षक' हा भावी पिढीचा शिल्पकार असून त्यांच्याकडून मिळणाऱ्या ज्ञानामुळे विद्यार्थ्यांना जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळते. आज सर्वपल्ली राधाकृष्णन यांची पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने हा विशेष लेख...

डॉ. राधाकृष्णन हे भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. डॉ. राधाकृष्णन हे शिक्षक, तत्त्वज्ञ आणि विद्वान म्हणून उल्लेखनीय कार्यासाठी ओळखले जातात. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याशी संबंधित काही गोष्टी जाणून घेऊयात.

डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी झाला. त्यांचा जन्म तामिळनाडूच्या तिरुत्तनी शहरात तेलगू कुटुंबात झाला. ते अभ्यासात हुशार होते आणि त्यांना अनेक शिष्यवृत्त्या मिळाल्या. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे असे मत होते की, समाजाच्या विकासामध्ये शिक्षक हा एक असा व्यक्ती आहे जो फार मोलाची अणि महत्वपूर्ण भुमिका पार पाडत असतो. आज सर्वपल्ली राधाकृष्ण हयात नाहीये पण त्यांचे शैक्षणिक विचार आजदेखील समाजात जिवंत आहेत.आजही त्यांचे विचार तरूणांना विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम करतात.

डॉ. राधाकृष्णन स्वामी विवेकानंद अणि वि.दा सावरकर यांना आपला आदर्श मानायचे. म्हणुन त्यांनी विवेकानंद अणि सावरकर यांच्या विषयी खोल अभ्यास देखील केला होता. अशा ह्या आदर्श शिक्षक, विचारवंत, तत्वज्ञ, लेखक, राजकीय कार्यकर्ताचे १९७५मध्ये १७ एप्रिल रोजी निधन झाले.
(साभार : इंटरनेट)




# एचपीने लॉन्च केला एआय असलेला गेमिंग लॅपटॉप

लॅपटॉप क्षेत्रात प्रसिद्ध HP कंपनीनं AI तंत्रज्ञान असलेले २ नवीन लॅपटॉप बाजारात आणले आहेत. गेमर्स आणि कंटेट क्रिएटर्ससाठी अतिशय उपयुक्त असा हा लॅपटॉप असून



ओमेन ट्रान्सेंड १४ आणि HP Envy x360 14 चा समावेश आहे. त्याचसोबत गेमिंगचा आणि कंटेट क्रिएशनचा अनुभव आणखी सुकर करण्यासाठी या लॅपटॉपमध्ये Intel चे अल्ट्रा प्रोसेसर्स दिले आहेत.

**काय आहेत फिचर्स?**

ओमेन ट्रान्सेंड १४ - एचपीतर्फे पहिला एआय अंतर्भूत ओमेन लॅपटॉप. गेमिंगसाठी AI तंत्रज्ञानाचा वापर- जे युजर्स गेमिंग आणि कंटेट क्रिएशनचं काम करतात त्यांच्यासाठी हा लॅपटॉप उपयुक्त ठरणार. प्रोसेसर- हे इंटेल कोअर अल्ट्रा प्रोसेसर आणि NVIDIA GeForce RTX 4060 ग्राफिक्ससह येते, ज्यामध्ये पुन्हा डिझाइन केलेले चेसिस आहे, जे थर्मल अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करू शकते. ओमेम ट्रान्सेंड १४ इंटेल आणि NVIDIA प्रोसेसर्समुळे लोकल एआय, बिल्ट इन एआय अशी दोन्ही वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. लाइव्ह ट्रान्सक्रिप्ट, व्हिडीओ कॉल दरम्यान रिअल-टाइम कॅप्शन इत्यादी अनेक वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत.

AI तंत्रज्ञानामुळे नोट्स काढणं, एखादा कार्यक्रम रेकॉर्ड करणं ही कामंसुद्धा सहज होऊ शकतात. १४ इंची गेमिंग लॅपटॉप जो आतापर्यंतचा सर्वांत हलका लॅपटॉप आहे. बॅटरी आणि चार्जर- हा लॅपटॉप 140W USB-C अडॅप्टरसह चार्जिंगला सपोर्ट करतो. लॅपटॉपला एका चार्जवर ११.५ तासांपर्यंत बॅटरी लाइफ मिळते. कनेक्टिव्हिटी- या लॅपटॉपच्या मागील बाजूस HDMI २.१ आउटपुटसह USB-C पोर्ट आहे. यात थंडरबोल्ट 4 USB-C पोर्ट आणि दोन USB-A पोर्ट देखील आहेत.

HP Envy x360 फिचर्स


डिव्हाइसमध्ये इंटेल कोअर अल्ट्रा ५ प्रोसेसर 125U आणि GPU साठी इंटेल आर्क इंटिग्रेटेड ग्राफिक्स आहेत. लॅपटॉप Windows 11 होम प्री-इंस्टॉलसह येतो. या नवीन लॅपटॉपमध्ये इंटेल प्रोसेसर्स आहेत त्यामुळे अडोब फोटोशॉप वापरणाऱ्यांची मोठी सोय होणार आहे. स्लिक आणि स्टायलिश असून ३६० डिग्रीमध्ये रोटेट होऊ शकतो.

# विनोदी साहित्यिक वि.आ. बुवा

विनायक आदिनाथ बुवा हे मराठी भाषेतील विनोदी साहित्यिक होते. ते वि. आ. बुवा या नावाने प्रसिद्ध होते. त्यांनी आपल्या लेखनाचा प्रारंभ इ.स. १९५० मध्ये केला. त्यांची विनोदी शैलीतील एकूण १५०हून अधिक पुस्तकेत प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी विनोदी लेखनाबरोबरच आकाशवाणीवरील श्रुतिका, विनोदी निबंध, पटकथा, तमाशाच्या संहिता, विडंबने, एकांकिका असे विविध स्वरूपाचे लेखन केले आहे. त्यांचा आज स्मृतिदिन आहे.

वि.आ. बुवांचा जन्म पंढरपूर येथे ४ जुलै, इ.स. १९२६ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण त्यांनी पंढरपूर आणि मिरज येथे झाले. वडिलांच्या अकाली निधनामुळे शिक्षण अर्धवट राहिले. नोकरीसाठी ते कल्याण येथे स्थाईक झाले. मुंबई येथील व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्सगटिट्यूटमध्ये बुवा यांनी रसायनशास्त्र विभागात इ.स. १९८६ मध्ये निवृत्त होईपर्यंत नोकरी केली. बुवा यांचे वक्तृत्व उत्तम असल्याने व्याख्याने व कथा-कथनासाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्येही त्यांनी दौरे केले होते. संस्कृत भाषेचा त्यांचा चांगला अभ्यास होता.

सुंदर हस्ताक्षराच्या जोरावर त्यांनी इ.स. १९५० मध्ये इंदुकला नावाचा एक




**विशेष**

हस्तलिखित साहित्याचा अंक प्रकाशित केला होता. हे हस्तलिखित दर्जेदार स्वरूपात असल्याने साहित्यिकांचा चांगला पाठिंबा यास मिळाला. अनंत काणेकर, महादेवशास्त्री जोशी, चिं. वि. जोशी, दुर्गा भागवत, माधव मनोहर, गो. नी. दांडेकर, शांता शेळके, वसंत बापट, विजय तेंडुलकर आणि द. मा. मिरासदार असे गाजलेले साहित्यिक या अंकासाठी लिखाण करत असत. पुढे नवशक्ती या वृत्तपत्राचे संपादक प्रभाकर पाध्ये यांनी त्यांना वृत्तपत्रातून लिखाणासाठी उद्युक्त केले आणि त्यांनी वृत्तपत्रातून विनोदी लेखनास प्रारंभ केला. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, कल्पकता आणि उत्स्फूर्त विनोद ही वि. आ.बुवा यांच्या लेखणीची वैशिष्ट्ये मानली जातात. त्यानंतर हंस दिवाळी अंक, मोहिनी दिवाळी अंक, नवयुग दिवाळी अंक, आवाज दिवाळी अंक आणि कितीतरी मासिके व दिवाळी अंकांतून बुवा लेखन करू लागले. वि. आ. बुवा यांचा पहिला कथासंग्रह अकलेचे तारे इ.स. १९५३मध्ये प्रसिद्ध झाला. महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथ आणि नाट्य पुरस्कार समित्यांवर अनेक वर्षे त्यांनी परीक्षक म्हणून काम पहिले होते. आकाशवाणीवर त्यांचे ६००हून अधिक कार्यक्रम प्रसारित झाले. त्या काळच्या पुन्हा प्रपंच या लोकप्रिय मालिकेसाठी ४००हून अधिक भागांचे लेखन त्यांनी केले.

**पुरस्कार**

इ.स. १९७२ मध्ये कल्याणमध्ये झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून निवड, इ.स. १९८३ 'प्रेमाची एस्सो स्टाइल' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कार, इ.स. १९९७ 'शंभरावे पुस्तक' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कार, इ.स. १९९७ उत्कृष्ट विनोदी लेखक म्हणून मुंबई मराठी साहित्य संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार. (साभार : विकीपीडिया)

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी महापालिकेतर्फे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर अशा रांगोळ्या काढून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन नागरिकांना केले.**

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या, ऊन लागल्याने हार्ट अटॅक नेमका का येतो?

बऱ्याच वेळा आपण ऐकले असेल की, उन्हात अधिक फिरल्याने हार्ट अटॅक येतो, मात्र हा हार्ट अटॅक नेमका का येतो आणि त्याच्यापासून आपण कशाप्रकारे बचाव करू शकतो, याबद्दल सविस्तर जाणून घ्या. हेच नाही तर यावर डॉक्टरांनीदेखील आपले मत मांडले आहे.



सध्या देशातील अनेक शहरात तापमानामध्ये मोठी वाढ झालीये. अनेक ठिकाणी तर पारा ४० अंशाच्या वर गेलाय. ऊन अधिक लागल्याने बरेच लोक आजारी देखील पडतात. ऊन लागल्याने हार्ट अटॅक येण्याचीदेखील खूप शक्यता असते. यासाठी आवश्यक ती काळजी घेणे खूप जास्त महत्त्वाचे ठरते. उन्हाळ्यात हार्ट अटॅक टाळण्यासाठी काही गोष्टी फॉलो करणे अत्यंत आवश्यक ठरते. हार्ट अटॅक उन्हाळ्यात येण्याची अधिक शक्यता असते. उन्हाचा थेट परिणाम हा आपल्या शरीरावर होतो. आता याबद्दल डॉक्टरांनीदेखील मोठे भाष्य केले आहे.

उन्हाळ्यात थकवा लवकर जाणवतो. थकव्यामुळे थेट हार्ट अटॅकदेखील येऊ शकतो. बऱ्याच वेळा उन्हात फिरल्याने डोकेदुखी होते. या डोकेदुखीमुळे बीपी वाढण्याची दाट शक्यता असते. जर वेळीच याकडे लक्ष दिले नाही तर हार्ट अटॅक येऊ शकतो. उन्हाळ्यात जास्तीत जास्त पाणी पिण्यावर भर द्या. अनेकांना उन्हातून आल्यावर चक्कर येते, अशावेळी देखील हार्ट अटॅक येण्याची शक्यता अधिक असते, यामुळे अशावेळी डॉक्टरांशी संपर्क साधावा.

कार्डियोलॉजी विभागाचे डॉ. अजित जैन म्हणाले की, उष्माघातामुळे हार्ट अटॅक येण्याची शक्यता अधिक असते. वाढत्या उन्हामुळे आपले शरीर हे तापमान राखण्याचा प्रयत्न करत असते, यामुळे हार्ट बीट अधिक वाढतात. या वेळी हृदयावर दबाव येतो. हार्ट बीट अचानक वाढल्याने हार्ट अटॅक येण्याचा धोका असतो. उन्हात अधिक काळ बाहेर राहिल्याने हार्ट अटॅक अधिक येतो. वयस्कर लोक आणि गर्भवती महिलांनी शक्यतो उन्हात जास्त बाहेर पडून नये. दिवसाला सात ग्लॉस पाणी प्यावे. लिंबू पाण्याचा देखील समावेश करावा. शक्यतो उन्हात बाहेर पडताना पूर्ण काळजी घ्यावी.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# सुनील तटकरेंना प्रचंड मताधिक्क्याने निवडून आणू

## शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांचे प्रतिपादन

**पाली : प्रतिनिधी**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या सक्षम आणि विकासपुरुषाच्या नेतृत्वात देशाची अत्यंत गतिमानतेने प्रगतीपथावर वाटचाल सुरू आहे. राज्यात महायुतीच्या माध्यमातूनदेखील व्यापक आणि सर्वांगीण विकास साधला जातोय. आगामी लोकसभा निवडणुकीत रायगड कोकणच्या उज्ज्वल भवितव्यासाठी महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्यासारख्या कार्यक्षम आणि विकासदृष्टी असलेल्या प्रभावी नेतृत्वाला पुन्हा लोकसभेत येथील जनता नक्की संधी देईल, असा दावा व्यक्त करीत त्यांना प्रचंड मताधिक्क्याने निवडून आणू, असे आवाहन शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांनी केले.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यातील परळी, जांभूळपाडा जिल्हा परिषद मतदारसंघातील शिवसेना, राष्ट्रवादी आरपीआय आणि अन्य घटकमित्र पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक परळी विभागात नुकतीच पार पडली.

बैठकीस शिवसेना माजी सभापती पिठू डुमना, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी सरपंच शेखर डोंगरे, दहिगाव सरपंच विष्णू वाघमारे, घोटवडे सरपंच श्री झोरे, महेंद्र गायकवाड, परळी ग्रामपंचायत सरपंच साक्षी देसाई, बापूराव देसाई, सतीश देसाई, मानखोऱ्यातील नेते विलास पालवे, प्रमोद कदम, धर्मेंद्र आंदेकर, अजित देसाई, राजा मानकर, पंकज देसाई, संदेश लोंढे, आदींसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रकाश देसाई पुढे म्हणाले, अनंत गीते यांना जनतेने सहा वेळा लोकसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली, मात्र ज्या विकासाची अपेक्षा जनतेला होती, त्याचा पूर्णपणे अपेक्षा भंग झाला. नैसर्गिक आपत्ती, कोरोनासारख्या संकटात ते कुठे दिसले नाहीत. रायगडच्या जनतेची त्यांना सोयीस्करपणे आठवण होते तर सोयीने विस्मरण होते. सुनील तटकरे हे विकासाचे दुसरे नाव तर अनंत गीते हे निष्क्रियतेचे दुसरे नाव असे म्हटले जाते त्यात काही वावगे नाही. रायगडला प्रगतीपथावर न्यायचे असेल तर सुनील तटकरे यांना पुन्हा खासदार करण्याखेरीज पर्याय नाही असे देसाई आपल्या मार्गदर्शनात म्हणाले.

# पाली–खोपोली महामार्गावर तीन अपघात

## एकाचा मृत्यू, इतर गंभीर जखमी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली–खोपोली राज्य महामार्गावर सोमवारी (दि.१५) एकाच दिवसात या मार्गावर भालगुल, वऱ्हाड व नानोसे या ठिकाणी तीन अपघात झाले. या अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे, तर इतर जण गंभीर जखमी आहेत.

वाकण–पाली–खोपोली राज्य महामार्गाचे नुकतेच रुंदीकरण पूर्ण झालेले आहे. या मार्गावर वऱ्हाड गावच्या हद्दीत सायंकाळच्या सुमारास पालीकडून परळीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराने खोपोली बाजूकडून पालीकडे जाणाऱ्या कारला धडक दिली. दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.

नानोसे गावाच्या हद्दीत नायरा पेट्रोलपंपजवळ एका दुचाकीस्वाराने भरधाव वेगात रिक्षाला ओव्हरटेक करताना विरूद्ध बाजूने जात खोपोली बाजूकडून पालीकडे जाणाऱ्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. यामध्ये विरूद्ध बाजूने जाणाऱ्या ओव्हरटेक करणाऱ्या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. दुसऱ्या दुचाकीस्वार व त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. अपघातामुळे रिक्षादेखील पलटी झाली आणि रिक्षातील प्रवासी जखमी झाले आहेत.

भालगूल येथे पाली बाजूकडून खोपोली बाजूकडे जाणाऱ्या मोटारला खोपोली बाजूकडून पाली बाजूकडे येणाऱ्या दुचाकीने विरूद्ध बाजूला जाऊन वेगात येऊन मोटार कारला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार व त्याची पत्नी जखमी झाली आहे.





# मुरूड सुशोभिकरणाचे काम प्रगतिपथावर

## मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केली पाहणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडमध्ये दरवर्षी लाखो पर्यटक येत असतात. याठिकाणी पर्यटकांची योग्य सोय व्हावी, यासाठी मुरूड समुद्रकिनारा सुशोभीकरणासाठी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे. ते काम प्रगतीपथावर असून या कामाची पाहणी नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी करून कामाचा आढावा घेतला.



नगर परिषदेच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून समुद्रकिनारा सुशोभीकरण करण्याकरिता ११ कोटी ४३ लाख १२ हजार ७१६ रु. मंजूर करण्यात आले होते. या निधीतून सुशोभीकरण, वॉक वे, फूड कॉर्नर, वाहनतळ व अनुषंगिक सुविधा करणे आदी सुविधांचा समावेश आसणार आहे. त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढून यामधून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

# लोकसभा निवडणुकीसाठी चौकमध्ये पोलिसांचा रूट मार्च

**चौक : प्रतिनिधी**

आगामी सण, उत्सव व सार्वजनिक लोकसभा निवडणुकीदरम्यान चौक शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये व कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी चौक बाजारपेठेमधील मुख्य मार्गावरून पोलिसांचा रूट मार्च कढण्यात आला.

या रुट मार्चला चौक दूर क्षेत्र पोलीस ठाण्यातून सुरुवात झाली. चौक शहराच्या बाजारपेठेमधील शेवटचे ठिकाण तीन घर ते तारापूर पेठ, डाक बंगला रस्ता, राममंदिर असा रूटमार्च होऊन त्याची सांगता करण्यात आली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सुर्यवंशी यांनी चौक, खालापूर पोलिसांनी हा रूट मार्च काढला.



# खोपोलीत मोफत आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील प्रोग्रेसिव्ह पीपल सोशल ग्रुप या सामाजिक संघटनेतर्फे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात प्राथमिक तपासणी, कॅन्सरपूर्व चाचणी, डोळे तपासणी अशा तपासणी करण्यात आल्या.



टाटा हॉस्पिटल मुंबई यांच्या कॅन्सर तपासणी शिबिरात ६९ जणांनी आपली कॅन्सर पूर्व तपासणी करून घेतली, त्यानंतर रायगड हॉस्पिटल यांनी १३८ जणांची प्राथमिक तपासणी केली. यात इसीजी चाचणी ८४ व डोळे तपासणी १०३ जणांची करण्यात आली. यापैकी २५ जणांना पुढील उपचारासाठी मोफत सेवा देणार आहे

या शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास कुंटे, माजी नगरसेवक महादू जाधव, गोपीनाथ पवार, निनाद केळकर, आनंद ओसवाल, प्रशांत येवले, महेश मंडलिक, शैलेश पालांडे, समीर लिमये, गणेश साळुंखे, नितीन पवार, विनोद साळवी, अंकुश मंडलोक, लक्ष्मण होळकर, संदीप मोरे, ललित म्हात्रे, गणेश हिमुरकर, गोपी पवार, विश्वनाथ शिंदे, संदेश देशमुख, जिगर शहा, नितेश शहा, तुषार अहिरे आदी उपस्थित होते.

# महाडमध्ये रक्तदानातून महामानवाला अभिवादन

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीदिनानिमित्त रक्तदानाचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरातून रक्तदान करीत प्राथमिक शिक्षकांनी महामानवाला अभिवादन केले.



गेली काही वर्षे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरास राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे सचिव आनंद घाडगे, उपाध्यक्ष सुमित मोरे, सहसचिव शैलेश गायकवाड, संतोष हाटे, शिक्षक परिषदेचे राज्य प्रसिद्धी प्रमुख वैभव कांबळे, पत्रकार गोपाळ कांबळे, महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, पत्रकार उदय सावंत व समाजातील मान्यवरांनी या रक्तदान शिबिरात भेट देऊन रक्तदात्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला.

रक्तदान शिबिरासाठी राजिवली शाळेचे उपशिक्षक अनिल नलगे तसेच शिंगारकोंड शाळेचे उपशिक्षक विजय जाधव, प्रिती देशमुख या सर्वांनी अल्पोपहाराची सोय केली.

या वेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा महाडचे तालुकाध्यक्ष सचिन खोपडे, कार्यवाह प्रशांत माने, कार्याध्यक्ष बाळासाहेब बारगजे, संघटनमंत्री समीर होडबे, कोषाध्यक्ष रविंद्र पाटील, महिला आघाडी प्रमुख मनिषा पवनारकर, दिप्ती गावंड, स्मिता नवघरे, पुजा शहा, संगीता कांबळे, परीणीता मिंडे, दिपक साळवी, सुजित बनगर, संजय कोंडविलकर, संदेश वर्तक, हेमंत सारदळ, मिलिंद सारदळ, अरुण मोरे, रमेश देठे, बालाजी गुबनरे, प्रफुल्ल पवार,विजय जाधव, समाधान पाटील, मारोती कपाळे, प्रदीप धामनगावे, प्रशांत तुळसुळकर, सतीश बिरादार, सुरज चौरे, रामदास बोडके, संदीप मोरे, समीर मुल्ला, रूपेश पार्टे, नारायण कुंडले, विकास पवार, राकेश सावंत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मुस्लिम समाज खासदार तटकरे यांच्यासोबत

## राष्ट्रवादी जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष हसवारे यांचा दावा

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मुस्लिम समाज हा खासदार सुनील तटकरे यांच्यासोबतच असून अल्पसंख्याक समाजाविरूद्ध कोणी संभ्रम निर्माण करू नये. तटकरेसाहेबांनी ज्या वेळी अल्पसंख्याक मेळावा घेतला त्या वेळीही हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज उपस्थित होता. मुस्लिम समाजाची कब्रस्तान वॉल कंपाऊंड असो की शैक्षणिक काम असो सर्व कामे तटकरे यांनीच पूर्ण केल्याने मुस्लिम समाज हा त्यांना खंबीर ताकद देण्याचे काम करेल, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नाझीम हसवारे यांनी केले.



ते मुरूड येथे बोलत होते. या वेळी त्यांच्यासमवेत राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष फैरोज घलटे, अतिक खतीब, राजपुरी उपसरपंच इस्माईल सिद्दिक, मोरबा सरपंच जनाब रोहेकर, साई ग्रामपंचायतीचे सरपंच जनाब रहटविलकर, फॉऊंजेब डॉक्टर, मोईन गोलंदाज, आईमन अरब, अरबाज बक्षी आदी उपस्थित होते.

नाझीम हसवारे पुढे म्हणाले की, तटकरे साहेबांनी कोकणातील सर्वांत जुनी शैक्षणिक संस्था अंजुमन इस्लाम जंजिरा यांना ५० लाख रुपयांचा निधी प्राप्त करून दिला होता. मुस्लिम व अल्पसंख्याक मुले डॉक्टर व्हावीत, यासाठी त्यांनी म्हसळा परिसरात युनानी कॉलेज निर्मिती करून यासाठी ३३६ कोटी रुपये शासनाकडून मंजूर करून आणले. सहा वेळा निवडून गेलेल्या अनंत गीते याना म्हसळ्यातील कोणती माहित आहे का? गीते यांनी कोणतेही विकास काम केले नाही तर लोक त्यांना मते का देणार? तटकरे साहेब अल्पसंख्याक समाजासाठी २४ तास उपलब्ध असणारे व्यक्तिमत्व आहे. मागील निवडणुकीत मिळालेल्या मताधिक्यपेक्षा तिप्पट मताधिक्याने तटकरे साहेब निवडून येतील असा विश्वास हसवारे यांनी व्यक्त केला आहे.

# सायकलवर ७५ किमी प्रवास करून महामानवाला वंदन

## ११ वर्षीय हिरेनचे सर्वत्र कौतुक

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील चहा विक्रेत्याच्या ११ वर्षीय मुलाने भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी तब्बल ७५ किमी सायकलप्रवास करीत आगळ्यावेगळ्या पद्धतीने आदरांजली वाहिली. हिरेन राम हिसालके असे या मुलाचे नाव आहे. हा प्रवास साडेपाच तासांत पूर्ण केला.



११ वर्षीय हिरेन नेरळ येथील विद्याविकास शाळत शिकत असून त्यांचे वडील राम हिसालके हे चहाची टपरी चालवतात. या विद्यार्थ्याला सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्राने सायकल भेट दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने पहाटे ५.३० वा. हिरेन राम हिसालके हा विद्यार्थी सायकलवर स्वार झाला. त्या वेळी त्यांची आजी आवर्जून उपस्थितीत होती. नेरळ गावातील मोहाची वाडी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून हिरेनने आपला प्रवास सुरू केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सकाळी ५.३० वा. नेरळ कल्याण रस्त्याने वांगणीकडे प्रस्थान केले. पुढे वांगणी येथून कळंब रस्त्याने पाषाणे आर्डे साळोखमार्गे कळंब गाठले. त्यात साळोख आणि आर्डे येथे स्थानिकांनी स्वागत केले.

कर्जत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून कर्जत कल्याण रस्त्याने डिकसळ गाठले. येथे डिकसळ येथे शांतिदूत मंडळाच्या वतीने तेथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात हिरेनचा सत्कार करण्यात आला आणि तेथून कल्याण रस्त्याने नेरळ गाठले. नेरळ येथे हुतात्मा चौकात हुतात्म्यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. या सर्व प्रवासात त्याचे वडील राम हिसालके, दिवाकर कुलकर्णी, विघ्नेश हिसालके, विपुल हिसालके, वैभव हिसालके आदी सोबत होते.

## खालापुरात विद्युत पुरवठा खंडित; लोक घामाघूम

**खोपोली : प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व कामासाठी महावितरणाने विद्युत पुरवठ्याला दिलेल्या विश्रांतीमुळे मंगळवारी (दि.१६) खालापूरकर घामाघूम झाले.

चैत्रातच वैशाख वणव्यासारखी परिस्थिती असून, खालापूरात पारा चाळीशीच्या पार जात आहे. मंगळवारी खालापुरात महावितरणाकडून फांद्या छाटणीचे काम हाती घेण्यात आले होते. यासाठी मंगळवारी पाच तास विद्युत पुरवठा खंडित करण्यात आले होते. आतापासूनच वाढलेली गर्मी व त्यातच भागनियमनामुळे अंगाची लाही नाही झाली होती. खबरदारीचा उपाय म्हणून दोन महिन्यांपूर्वीच महावितरण मान्सूनपूर्व तयारीला लागला आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पुनाडे, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत १) पद्मावती राघो ठाकुर २) देविदास राघव ठाकुर ३) समाधान राघव ठाकुर ४) नंदकुमार राघव ठाकुर ५) अमित राघव ठाकुर ६) दर्शना दशरथ गावंड यांचे कडुन खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – पुनाडे, ता. उरण, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर.चौ. मी | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ९८/१२ | ०–१०–०० | ०.३३ |

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कपंनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादी द्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत व अनुशंगिक दस्त कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक १६/०४/२०२४
ठिकाण – उरण

सही/–
**ॲड. शरद जाधव**

**संपर्कासाठी पत्ता :** तळमजला, रॉयल प्राईड बिल्डीग, भुखंड क्र. ११३. मिडल क्लास को ऑप. हौ. सोसायटी, पनवेल– ४१०२०६. ता. पनवेल, जि. रायगड

# उष्णतेच्या लाटेपासून बचाव करा

## नवी मुंबई महापालिकेने सूचविल्या उपाययोजना

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाकडील आपत्ती व्यवस्थापनाने उष्माघाताच्या अनुषंगाने आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सूचनेनुसार उन्हाळ्यामध्ये नागरिकांनी उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरिता उष्मा लाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने नागरिकांनी कोणत्या उपाययोजना कराव्यात यासाठी नवी मुंबई पालिकेने आवाहन केले आहे.

पुरेसे पाणी प्यावे व तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्यावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. दुपारी १२ ते ३ वाजण्याच्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करावा.उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टी. व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा. हलके, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.





प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करावा.अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम अशी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचना द्याव्यात.पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा तसेच बाहेर काम करीत असल्यास मध्ये-मध्ये थोडा थोडा वेळ विश्रांती घेऊन नियमित आराम करावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.

**वैद्यकीय माहितीसाठी संपर्काचे आवाहन**

उष्णता विकारांची लक्षणे आढळल्यास किंवा याबाबत अधिक माहिती हवी असल्यास आपल्या नजीकच्या नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालय किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

### ■ 'या' गोष्टी टाळाव्यात!

उन्हात अतिकष्टाची कामे करू नयेत. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नयेत. दुपारी १२ ते ३ च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघड्या ठेवाव्यात. महाराष्ट्र राज्य हे उष्णतेच्या लाटेसाठी संवेदनशील राज्य असून उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने नागरिकांनी नमूद केलेल्या गोष्टींचे पालन करावे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिशा देण्याचे काम केले -अ‍ॅड. ठाकूर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

देशाला दिशा देण्याचे आणि समाज घडविण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आज जगभरात १३५ देशात बाबासाहेबांसाबी जयंती साजरी होत आहे. बाबासाहेबांच्या प्रत्येक कामावर पीएचडी करता येईल एवढे मोठे काम त्यांचे असल्याचे प्रतिपादन समाजवादी नेते आणि ९५ गाव नैना प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर यांनी खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त राहुल शिक्षक प्रसारक मंडळ संचलित सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सुरेश ठाकूर बोलत होते. पुढे ते म्हणाले की, उपेक्षित माणसाला स्वातंत्र्याचा लाभ मिळाला पाहिजे याकरीता बाळासाहेब झटले. रायगड जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या खोतांविरोधातील शेतकऱ्यांच्या लढ्याला बाबासाहेबांनी कायदेशीर बळ दिल्याचे त्यांनी सांगितले.

सत्याग्रह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहत



सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. समाजातील प्रत्येक घटक शिक्षित झाला पाहिजे. यासाठीच आमची संस्था कार्यरत आहे. भांडवलशाहीच्या हाती गेलेली हि लोकशाही आभासी आहे. या परिस्थितीत नक्कीच बदल होईल, अशी आशा डॉ. डोंगरगावकर यांनी व्यक्त केली.

या वेळी मुंबई महानगरप्रदेशातील शालेय विदयार्थी खुली वक्तृत्व स्पर्धा पार पडली. तसेच मी रमाई बोलते या डॉ. वैभवी धारगावकर कृत एकांकी प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.



**पनवेल : भाजपचे नेते व सामाजिक कार्यकर्ते रवी नाईक आणि माजी नगरसेविका वर्षा नाईक यांची कन्या सोनल हिच्या विवाह सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यांनी नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले.**




# फुंडे हायस्कूलमध्ये 'सुट्टीचा सदुपयोग'

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात सुट्टीचा सदुपयोग-शिकूया उद्योग या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांच्या विचारातून आणि मार्गदर्शनाखाली विद्यालयात १५ ते ३० एप्रिल २०२४ या दरम्यान या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी उपक्रमाचे उदघाटन झाले. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य एम. जी. म्हात्रे, पर्यवेक्षक एस.जी. म्हात्रे, कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, लक्ष्मण पाटील, योगेश पाटील आदी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत कागद काम, सायकल दुरुस्ती, वस्तू निर्मिती, नर्सरी तयार करणे, फेटे बांधणे, रांगोळी प्रशिक्षण, व्यक्तिमत्व



विकास, मेहंदी प्रशिक्षण, शिवणकाम प्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, पोलीस-सैनिक भरती मार्गदर्शन, ज्वेलरी मेकिंग, व्यवसाय मार्गदर्शन, आरोग्य व्यवस्थापन, वजन कमी करणे इत्यादी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. बाह्य तज्ञ मार्गदर्शक आणि सर्व सेवक यांच्या सहकार्याने वरील उपक्रमाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे.

उद्घाटन सोहळ्यावेळी प्रास्ताविक सादर करताना नितेश मेतकर यांनी या उपक्रमाचे उद्दिष्टे आणि वैशिष्ट्ये सांगितली. सूत्रसंचालन एच. एन. पाटील यांनी केले.

या उपक्रमाचे पहिले पुष्प म्हणजे व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन झाले. विद्यालयाचे प्रा. दिनेश सासवडे आणि प्रा. कोळी डी. पी. यांनी इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन केले.

# नवी मुंबई महापालिकेच्या शाळेत कम्युनिटी डे; अटल इनोव्हेशन मिशनद्वारे उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थी व तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्या नीती आयोगाने अटल इनोव्हेशन मिशनच्या अंतर्गत अटल टिंकरिंग लॅब हा प्रयोग संपूर्ण देशातील निवडक शाळांमध्ये सुरू केलेला आहे. नीती आयोगाच्या सूचनेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने देशभरातील शाळांमध्ये अटल टिंकरिंग लॅब कम्युनिटी डे साजरा केला जातो. मनपाच्या शाळा क्र.१०५ घणसोली या शाळेमध्ये मंगळवारी (दि. १६) कम्युनिटी डे साजरा करण्यात आला.

या शाळेतील प्रशस्त अशा अटल टिंकरिंग लॅबमध्ये नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा क्रमांक १०५, प्राथमिक शाळा क्रमांक ४२ व प्राथमिक शाळा क्रमांक ७६ या शाळांमधील ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या वेळी अटल टिंकरिंग लॅबच्या रीजनल मेंटल ऑफ चेंजच्या केतना मटकर, इंदिरा गांधी इंजिनिअरिंग कॉलेज घणसोली येथील एआयएमएल विभागाच्या प्रमुख प्रा. सोनाली देशपांडे, प्रा. सविता खेडेकर लोकमान्य टिळक इंजिनिअरिंग कॉलेज कोपरखैरणे येथील प्रा. दिनेश औटी आणि जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था



रहाटोली ठाणे येथील अधिव्याख्याता डॉ. प्रभा खरटमोल उपस्थित होत्या.

कम्युनिटी डेमध्ये विद्यार्थ्यांनी अटल टिंकलिंगच्या माध्यमातून तयार केलेल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, मेकॅनिकल इत्यादी विषयातील ज्ञानाच्या आधारावर शालेय विद्यार्थ्यांनी प्रकल्प तयार केले होते. स्मार्ट डस्टबिन, इंटेलिजन्ट रेल्वे सिक्युरिटी सिस्टीम, स्मार्ट सफाई बोट, अर्धांग वायू झालेल्या व्यक्ती करता विशेष पद्धतीने तयार केलेला ग्लोज यासारखे इनोव्हेटिव्ह प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

या वेळी विद्यार्थी स्वतःच्या ज्ञानाचा उपयोग समाजातील समस्या सोडवण्यासाठी करीत आहेत हीच मोठी कौतुकास्पद बाब असल्याचे प्रा. सोनाली देशपांडे यांनी व्यक्त केले. आपल्या काळातील वेगवान तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थी कुशलतेने करीत असल्याबाबत सविता खेडेकर यांनी समाधान व्यक्त केले. दिनेश औटी यांनी इनोव्हेटिव्ह प्रकल्पांना नेहमीच मार्गदर्शन आणि सहकार्य करण्याची आश्वासन दिले. जर विद्यार्थी त्यांच्या नावाने समाज उपयोगी मॉडेल तयार करत असतील तर त्याच्यासाठी लागणारी सर्व मदत करण्याची हमी प्रा. दिनेश औटी यांनी दिली.

शाळेचे मुख्याध्यापक अशोक सोनवणे यांनी कम्युनिटी डे हा कम्युनिटीसाठी कशा पद्धतीने साजरा केला जावा याची अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील सहाय्यक शिक्षिका कीर्ती पाटील यांनी केले व या कार्यक्रमासाठी तांत्रिक सहाय्य शाळेतील सहाय्यक शिक्षक प्रदीप महाला यांनी केले.

# उरण महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग, अकाउंटिंग अ‍ॅण्ड फायनान्स विभाग व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने रोल ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड मॅनेजमेंट इन असेलरेटिंग क्रिएटिव्ह इकॉनोमी'(वाणिज्य, उद्योग व व्यवस्थापनातील अर्थव्यवस्था निर्माण गतीची भूमिका) या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शनिवारी (दि.१३) केले गेले.

या परिषदेसाठी देशातल्या विविध राज्यातून अनेक संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक यांनी सहभाग नोंदवला. परिषदेचे प्रास्ताविक परिषदेचे संयोजक प्रा. व्हि. एस. इंदुलकर यांनी केले. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए.शामा यांनी केले. परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून डॉ. सुरेश मैंद (अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा



अध्यक्ष, अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ) हे होते. तर बीजभाषक म्हणून डॉ. एच. के.सिंग, (विभाग प्रमुख, कॉमर्स विभाग, वाराणसी, उत्तर प्रदेश)हे होते. त्यांनी विविध उदाहरणांच्या साह्याने देशाच्या आर्थिक धोरणाचे विश्लेषण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पराग कारुलकर यांनी केले. तर आभार प्रा.रियाज पठाण यांनी व्यक्त केले. पहिल्या तांत्रिक सत्रात साधन व्यक्ती म्हणून डॉ.अयकपाम चानू (बोडोलँड विद्यापीठ, आसाम), ह्या उपस्थित होत्या. तर सत्राध्यक्ष म्हणून विनायक राजे (प्राचार्य, के.बी कॉलेज मुंबई) हे होते. या सत्रात एकूण १३ संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. विनिता तांडेल यांनी. तर आभार प्रा.पूजा गुप्ता यांनी व्यक्त केले. दुसऱ्या तांत्रिक सत्रात साधन व्यक्ती म्हणून प्रा.डॉ.विकास गायकर (सी एच एम कॉलेज उल्हासनगर, सदस्य, अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ) हे उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून डॉ. सुनील नरवडे (अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) हे होते. या सत्रात देशाच्या विविध राज्यातील एकूण नऊ संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. एम.जी. लोणे यांनी दिला तर आभार डॉ.एच.के. जगताप यांनी व्यक्त केले. दोन्ही सत्राचे सूत्रसंचालन प्रा.हन्नत शेख यांनी केले. समारोपीय सत्रात डॉ.ए.आर.चव्हाण यांनी परिषदेचे आढावा वाचन केले.

प्राचार्य डॉ. पराग आजगावकर (एम. एन. कॉलेज विलेपार्ले, मुंबई) हे समारोपीय कार्यक्रमाचे मुख्य अतिथी होते. त्यांनी विषयाची प्रासंगिकता सविस्तरपणे मांडली. तर समारोप सत्रात प्राचार्य के.ए. शामा यांनी मनोगत व्यक्त केले.संस्थेचे सीईओ मा. श्री प्रदीपचंद्र शृंगारपुरे यांची विशेष उपस्थिती परिषदेत होती. प्रा.व्हि.एस. इंदुलकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# ज्ञानस्मारकाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

'ज्ञान हीच शक्ती' या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रणालीवर आधारित नवी मुंबई महानगरपालिकेने ऐरोली येथे उभारलेले भव्यतम स्मारक हे 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे. डॉ. बाबासाहेबांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून नागरिकांनी याठिकाणी ज्ञानसूर्याला अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी ज्ञानस्मारकाला भेट देत बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले तसेच जयंतीनिमित्त स्मारकाला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची पाहणी केली. या प्रसंगी त्यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व शिरीष आरदवाड, शहर अभियंता संजय देसाई उपस्थित होते.

२०२१ मध्ये ५ डिसेंबरला स्मारकातील सुविधा लोकार्पण झाल्यानंतर या स्मारकाकडे नागरिकांचा सातत्याने ओढा राहिला असून मागील सव्वा दोन वर्षात दोन लाख ५७ हजार ३४० इतक्या मोठ्या संख्येने नागरिकांनी नोंद करून या ठिकाणी भेट देत आगळेवेगळे स्मारक म्हणून या स्मारकाची प्रशंसा केली आहे. आजही बाबासाहेबांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून सायं. ४पर्यंत कडक उन्हाळा असूनही साडेआठ हजारहून



अधिक नागरिकांनी स्मारकाला भेट देत बाबासाहेबांच्या ज्ञानस्मृतींना अभिवादन केले आहे तसेच स्मारकाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. संध्याकाळनंतर व रात्री नागरिकांचे कुटुंबासमवेत स्मारकाला भेट देण्याचे प्रमाण अधिकच वाढणार आहे.

स्मारकातील समृद्ध ग्रंथालयात ५२८२ इतक्या मोठ्या संख्येने बाबासाहेबांनी लिहिलेले व बाबासाहेबांसह इतर महनीय पुरुषांच्या चरित्रावर आधारित मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील विपुल ग्रंथसंपदा उपलब्ध असून ऑडिओ व्हिज्युअल इ- लायब्ररी सुविधा देखील उपलब्ध आहे. त्यामुळे हे ग्रंथालय म्हणजे सर्वसामान्य वाचकांप्रमाणेच अभ्यासकांसाठीही ज्ञानसमृद्ध असा ठेवा आहे. या ठिकाणचा 'विशेष संविधान कक्ष' संविधानाची महती मनामनात रुजवण्यासाठी उपयोगी आहे. या ठिकाणी होणाऱ्या 'विचारवेध' व 'जागर' ह्या व्याख्यानशृंखला वाचन संस्कृतीचा व्यापक प्रसार करतात.

बाबासाहेबांचे जीवनचरित्र दुर्मीळ छायाचित्रांतून मांडणारे विशेष छायाचित्र दालन हे स्मारकाचे खास आकर्षण असून त्यामधून अनेकांना प्रेरणा मिळत आहे. आभासी चलचित्र प्रणालीद्वारे बाबासाहेबांचे प्रत्यक्ष भाषण ऐकण्याची संधी देणारा अत्याधुनिक होलोग्रफिक प्रेझेंटेशन शो भारावून टाकतो. याशिवाय एकाच वेळी २०० व्यक्ती ध्यान करू शकतील असे भव्य ध्यान केंद्र वेगळी अनुभूती देते. अशा विविध वैशिष्ट्यांमुळे हे ज्ञानस्मारक सर्वांचेच आकर्षण केंद्र झाले असून या माध्यमातून बाबासाहेबांचे शिक्षण व ज्ञानातून प्रगतीचे विचार जनमानसात प्रसारित होत आहेत. भीम जयंती दिनानिमित्त या स्मारकाला लक्षवेधक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.



# उन्हाळ्याची सुट्टी... AI शी गट्टी...
## चला करूया MS-CIT!

Scan for more details

# MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

Unlock your Digital Curiosity



Scan for more details

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

mscit.mkcl.org

klic.mkcl.org

### Introduction to Fourth Industrial Revolution IR 4.0

Robotics · 3D Printing · Virtual Reality · Mobile App Development · Big Data · Coding · Augmented Reality · Cyber Security · Artificial Intelligence · Internet of Things

MKCL ज्ञानदीप लावू जगी www.mkcl.org

### Career Oriented Courses after MS-CIT Course

KLiC Tally Prime with GST · KLiC Advanced Excel · KLiC Graphic Design · KLiC DTP CorelDraw/Adobe · KLiC BFSI / Retail Mgt. · KLiC C & C ++ Programing · KLiC Java / Python · KLiC AutoCAD · KLiC AI & ML · KLiC IT Hardware & Networking

## इयत्ता ५ वी पासूनच्या विद्यार्थांसाठी उन्हाळी सुट्टीतील प्रवेश सुरु.

## MKCL चे अधिकृत अध्ययन केंद्र

### अलिबाग तालुका
- शर्मिंस कॉम्प्युटर एज्युकेशन, अलिबाग .................. 9404562466
- दि ॲप्पल कॉम्प्युटर, रेवदंडा .................. 9021226349
- डिझाईन कॉम्प-टेक सिस्टीम्स, नागाव .................. 9119509336
- व्ही-टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, चोंढी .................. 9822833811
- ना. ना. पाटील कॉम्प्युटर एज्युकेशन, पेझारी ............ 9823629911
- क्रियेटीव्ह टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, अलिबाग ....... 9421163332
- श्री समर्थ इन्फोटेक, चोंढी .................. 9673768750
- क्रियेटीव्ह टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, रेवदंडा ......... 9421163332
- क्रियेटीव्ह टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, अलिबाग ....... 9049403292
- नॅशनल कॉम्प्युटर्स, पोयनाड .................. 9420838077
- श्री समर्थ इन्फोटेक, रांजणपाडा .................. 9850751212
- एनआयसीएल कॉम्प्युटर एज्युकेशन, पोयनाड ......... 9637745074
- ॲपेक्स कॉम्प्युटर एज्युकेशन, अलिबाग ............ 9552392085
- श्री समर्थ इन्फोटेक, हाशिवरे .................. 9673768750
- वरदनेट कॉम्प्युटर, चोंढी .................. 9765617143
- श्री कॉम्प्युटर्स, फोफेरी .................. 7066721091
- सिद्धिविनायक कॉम्प्युटर्स, चेंढरे .................. 8097100369
- क्रियेटीव्ह टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, चेंढरे ........... 9421163332
- डिझाईन कॉम्प्युटर्स, गरुडपाडा .................. 8446852321
- आदिती कम्युनिकेशन, वेश्वी .................. 9823531575
- ॲम्पल इन्फोटेक, वरसोली .................. 9423822487

### कर्जत तालुका
- व्हिजन इन्फोटेक, दहिवली .................. 9987018010
- कॉम्प-टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, कर्जत ........... 7743875666
- जुईली फाउंडेशनचे जुईली कॉम्प्युटर प्रशिक्षण, नेरळ . 9323257512
- कॉम्प-सॉफ्ट कॉम्प्युटर्स, कशेळे .................. 9273022238
- ॲसेट कंप्युटर एज्युकेशन, कर्जत .................. 9892233858
- लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सेंटर, कडाव .................. 9209196094
- श्री गणेशा कॉम्प्युटर एज्युकेशन सेंटर, नेरळ ........... 8655224969
- श्री समर्थ कृपा कॉम्प्युटर सेंटर, नेरळ .................. 9767852607
- त्रिशा इन्फोटेक, डिकसळ .................. 9860110205

### खालापूर तालुका
- कॉम्प्युटर पॉईंट, खोपोली .................. 9422383498
- सॉफ्टेक कॉम्प्युटर, चौक .................. 9326990322
- ओमकार कंप्युटर, खोपोली .................. 9921668888
- कॉम्प-एड कॉम्प्युटर्स, मोहोपाडा .................. 9970186344
- कॉमटेक कॉम्प्युटर्स, चांभार्ली .................. 9096166964
- युनिटेक कॉम्प्युटर, खोपोली .................. 9004024344
- जे.व्ही.सी. एज्युकेशन, मोहोपाडा .................. 9850134714
- श्री इन्फोटेक, रसायनी .................. 9850134714
- सम्यक कॉम्प्युटर एज्युकेशन, तुपगाव .............. 7558633771

### महाड तालुका
- कॉलेज ऑफ आय.आय.टी., महाड .................. 9423379838
- स्वराज कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, बिरवाडी ............... 9960318418
- करियर कॉम्प्युटर अकॅडमी, महाड .................. 9967292558
- पार्वती कॉम्प्युटर, महाड .................. 9422081825
- आमिया'ज ॲकाडमी, महाड .................. 9689576424

### माणगाव तालुका
- महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी, गोरेगाव . 9766368375
- ज्योती कॉम्प्युटर्स, निजामपूर .................. 9960161549
- आस्क मी कॉम्प्युटर सोल्युशन, माणगाव .......... 9637891229
- शरयू कॉम्प्युटर एज्युकेशन, माणगांव .................. 9260380510
- हर्ष कॉम्प्युटर एज्युकेशन, लोणेरे .................. 8000330808
- श्री कॉम्प्युटर्स, इंदापूर .................. 9561481281

### म्हसळा तालुका
- आयकॉन कॉम्प्युटर्स, म्हसळा .................. 7745037702

### मुरुड तालुका
- सिस्टेक कॉम्प्युटर, मुरुड .................. 9423376968
- श्री कॉम्प्युटर, नांदगाव .................. 7769007399
- ॲपेक्स कंप्यूटर एज्युकेशन, मुरुड .................. 9975003229
- प्रसाद इन्फोटेक, बोर्ली .................. 8983330346

### पनवेल तालुका
- एसे इन्फोटेक कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, कळंबोली ........ 9702247008
- वेबटेक कॉम्प्युटर्स, खांदा कॉलनी .................. 9869235093
- एस.आय.सी.टी. कॉम्प्युटर एज्युकेशन, पनवेल ......... 9137354851
- बाईट कॉम्प्युटर, पनवेल .................. 9820539015
- सिस्टीम इन्फोटेक, कळंबोली .................. 9987671794
- शाहू इन्स्टिट्यूट, नवीन पनवेल .................. 9324242932
- परम इन्फोटेक, कळंबोली .................. 9322652841
- श्री कॉम्प्युटर, कामोठे .................. 8655057355
- ॲसेट कंप्युटर एज्युकेशन, पनवेल .................. 9320076333
- ग्लोबल कॉम्प्युटर एज्युकेशन, कळंबोली ............... 9029483848
- सिटी कॉम्प्युटर एज्युकेशन, कळंबोली .................. 9702855442
- प्रगती कॉम्प्युटर्स, नवीन पनवेल .................. 9870791168
- जीटेक जैन कीर्ति एज्युकेशन. नवीन पनवेल ............ 8433630608
- श्रीराम कॉम्प्युटर एज्युकेशन, नवीन पनवेल ........... 9422275048
- डेटाकॉम टेक्नॉलॉजीस, पनवेल .................. 9773444413
- स्कायलार्क कॉम्प्युटर ॲकाडमी, नवीन पनवेल ......... 9773390811
- आकाश कॉम्प्युटर एज्युकेशन, कामोठे .................. 8108331331
- जीटेक जैन कीर्ति एज्युकेशन, कामोठे .................. 9076460156
- दुर्गे कॉम्प्युटर क्लासेस, देवीचा पाडा .................. 7666440573
- पार्थ इन्फोमेडिया, कामोठे .................. 7045904210
- मुळ्येज कॉम्प्युटर एज्युकेशन, पनवेल ............. 9619313779
- केजीआयटी कॉम्प्युटर ॲकाडमी, खारघर .......... 9326404371
- सिद्धिविनायक कॉम्प्युटर्स, कामोठे .................. 8356096026
- इ-स्पेस कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, कर्नाळा नाका ... 8898589263
- महाराष्ट्र कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, खारघर ........ 8655556219
- मास्टर्स कॉम्प्युटर ॲकाडमी, कामोठे ............. 8454805777
- मास्टर्स इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, तळोजा . 7039806768
- रिद्धी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, पनवेल ............. 7039541195
- साईकृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, केलवणे ............... 9664770708
- जीटेक जैन कीर्ति एज्युकेशन, उलवे ............... 9082649452
- मास्टर्स कॉम्प्युटर ॲकाडमी, करंजाडे ............... 8451064991
- मास्टर्स इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, करंजाडे ..8433566565
- मास्टर्स इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी, तळोजा . 7506906768
- डेटाकॉम टेक्नॉलॉजीस, रोहिंजन .............. 9702805070
- मेरिट-टेक कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, उलवे ............... 9004669256
- रिद्धी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, कामोठे ................ 8692054502
- एक्सलंस आयटी कॉम्प्युटर एजुकेशन, करंजाडे ...... 8080466566
- ग्लोबल कॉम्प्युटर एज्युकेशन, कळंबोली ................ 9029483848
- डेटाकॉम टेक्नॉलॉजीस, नेरे ......................... 7506192941
- आरव्हीव्ही कॉम्प्युटर क्लासेस, नावडे ............. 8655502244
- स्वरा कॉम्प्युटर्स, खारकोपर ......................... 8108711095

### पेण तालुका
- वन अप कॉम्प्युटर ॲकाडमी, पेण ....................... 9975496341
- पार्थ कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, पेण ....................... 9422096209
- नॅशनल कॉम्प्युटर, पेण ......................... 9420836535
- स्कायला कॉम्प्युटर, पेण ......................... 7020503313
- गॅलॅक्सी इन्फोटेक, पेण ......................... 9823462006
- ओम कॉम्प्युटर्स, वडखळ ......................... 9767282863
- मोरया कॉम्प्युटर्स, पेण ......................... 9763291056
- एक्सेल कॉम्प्युटर्स, शिहू ......................... 9579592112

### पोलादपूर तालुका
- समृद्धी कॉम्प्युटर्स, पोलादपूर ....................... 9049040398

### रोहा तालुका
- बिट्स ॲण्ड बाईट्स, रोहा ....................... 9272980098
- अर्बन कंप्यूटर इन्स्टिट्यूट, रोहा ..................... 9271186405
- श्री कॉम्प क्रिएशनस, कोलाड ...................... 9890477213
- समर्थ कॉम्प्युटर्स, नागोठणे ......................... 9850888886
- बिट्स ॲण्ड बाईट्स, कोलाड ...................... 9272980098
- सिद्धराज कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, चणेरे .................. 8806832158

### श्रीवर्धन तालुका
- क्रिएटिव्ह इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी, श्रीवर्धन .9226476400
- क्रिएटिव्ह इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी, बोर्ली-पंचतन .9881690646
- सरस्वती कॉम्प्युटर एज्युकेशन, बोर्ली - पंचातन ........ 7507754718
- अविरा अकॅडमी, दिघी ................................ 7249844797

### सुधागड तालुका
- स्नेह कॉम्प्युटर, पाली ................................ 8097768449
- शुभम कॉम्प्युटर एज्युकेशन, पाली ......................... 9226333909

### तळा तालुका
- कृष्णा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, तळा ..................... 9260008083

### उरण तालुका
- कुणाल कॉम्प्युटर्स, जासई ............................ 8422095066
- मायक्रोनेट इन्फोटेक, जे.एन.पी.टी. ...................... 9820216668
- माय नॉलेज हब - कॉम्पटेक कॉम्प्युटर, उरण ........... 9224679999
- साईकृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कोप्रोली ............ 9664770708
- श्री गणेश कॉम्प्युटर्स, चिरनेर ..................... 9819557517
- श्री गणेश कॉम्प्युटर्स, दिघोडे ......................... 7666050506

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

• Accounting • Back Office • Career • Readiness • • Designing • Digital Arts • Digital Freelancing • • Hardware & Networking • Management • • New Coller Jobs • Programming •

TallyPrime, Adv. Excel, Python, Java, C & C++ Programming, Photoshop, English Speaking, IoT, BFSI, DTP, AutoCAD & More...

### क्लिक अधिकृत अध्ययन केंद्र
- कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, तळा ......................... 9767309081
- दीपिका कॉम्प्युटर इन्स्टिट्युट, मांडवा ............. 9049533821
- आरती कॉम्प्युटर्स, उलवे ....................... 9653307886
- जे एस इन्फोटेक, म्हसळा .................... 9158083750
- सी.के. ठाकूर स्कील डेव्हलपमेंट सेंटर, पनवेल ...... 9920436534
- फादर अग्ननल डिजिटल लिट्रसी सेंटर, डोनवत .... 8691091161
- व्हिजन सॉफ्टकॅड, खांदा कॉलनी .............. 8898196434
- रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँण्ड सायन्स, खारघर .. 7709153833

**फक्त अधिकृत अध्ययन केंद्रातच प्रवेश घ्या अन्यथा इतर अनधिकृत केंद्रामध्ये आपली फसवणूक होऊ शकते तसेच कोणत्याही कोर्सच्या सवलतीला बळी पडू नका.**

सौजन्य : शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी प्रा. लि., पनवेल